रायगड, मंगळवार दि. १९ डिसेंबर २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

न्या. शिंदे समितीचा दुसरा अहवाल राज्य सरकारला सादर

नागपूर : राज्यातील मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीच्या नोंदीसाठी आवश्यक पुराव्यांची तपासणी करण्यासाठी व प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी नेमलेल्या न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) समितीने तयार केलेला दुसरा अहवाल सोमवारी राज्य शासनाला सादर केला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, •➤ पान २ वर

आज इंडिया आघाडीची बैठक

मुंबई : मोदी सरकारला २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सत्तेतून खाली खेचण्यासाठी इंडिया आघाडीने व्रजमूठ आवळली आहे. इंडिया आघाडीची चौथी बैठक मंगळवारी दिल्लीत होत आहे. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे त्याचप्रमाणे आघाडीतील २८ पक्षांचे नेते उपस्थित राहणार आहेत. दिल्लीतील अशोक हॉटेलमध्ये सदरची बैठक पार पडणार आहे. चार राज्यांच्या निवडणूक निकालानंतर आघाडीची ही पहिलीच बैठक आहे.

आजचा अग्रलेख
संसदेतील दडपशाही

वे|ध|क

दुचाकीची कारला धडक

माणगाव : पुणे-माणगाव रस्त्यावर दुचाकीस्वाराने विरुद्ध दिशेला जात कारला समोरून जोरात धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू होऊन दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. उमाकांत तुकाराम फाळके (वय- ३४, रा. शिवाजीनगर वरवंड, जि. पुणे) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. सदरील अपघात १५ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास घडला. पोलिसांनी तपास केल्यावर सोमवारी १८ डिसेंबर २०२३ रोजी या अपघाताबाबत गुन्हा दाखल केला आहे. या अपघाताच्या घटनेची फिर्याद माणगाव पोलिस ठाण्याचे पोलिस हवालदार किरण तुणतुणे (३९) यांनी माणगाव पोलिस •➤ पान २ वर

डॉलरच्या बदल्यात दोन लाखांची फसवणूक

नवी मुंबई : अमेरिकन चलन असलेले डॉलर स्वस्तात देण्याचे आमिष दाखवून दोन लाखांची फसवणूक झाल्याचा प्रकार रविवारी नवी मुंबईतील घणसोली येथे घडला. याप्रकरणी रबाळे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुलफाम आलम अफसर अली असे फिर्यादीचे नाव असून, ते कांदिवली येथे राहणारे आहेत. त्यांचा परिचित एका नारळ विक्रेत्याने त्यांना २० डॉलरची नोट दाखवली होती. काही दिवसांपूर्वी एक फोन आला व फोनवरील व्यक्तीने तो नारळ विक्रेत्याचा भाऊ असल्याचे सांगितले. भावाने जशी नोट दाखवली, तशा त्याच्याकडे एक हजार सातशे पन्नास प्रति २० डॉलरच्या नोटा असल्याची माहिती दिली. •➤ पान २ वर

पुरवणी अर्थसंकल्पात साडेतीन कोटी रुपयांची तरतूद

जावेळे पूल नव्याने बांधणार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अतिवृष्टीमुळे जीर्ण झालेल्या श्रीवर्धन-जावेळे येथील पुलाच्या जागी नवीन पूल बांधण्यात आलेला नाही. त्यामुळे येथील ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत असल्याचा प्रश्न आ. जयंत पाटील यांनी विधानपरिषदेत उपस्थित केला. नवीन पूल तातडीने बांधण्यात यावा, अशी मागणी त्यांनी सोमवारी केली. यावेळी बांधकामंत्री रवींद्र चव्हाण यांनी नवीन पूल बांधण्याचे आश्वासन देत पुरवणी अर्थसंकल्पात साडेतीन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, असे सांगितले. त्यामुळे लवकरच जावेळे येथील पुलाचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

आ. जयंत पाटील यांच्या मागणीला यश

मच्छिमारांच्या प्रश्नांबाबत आ. जयंत पाटील प्रयत्नशील

राज्यासह रायगड जिल्ह्यातील मच्छिमार बांधव मासेमारी करून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित आहेत. मात्र आजही मूळ मच्छिमार सुविधांपासून वंचित आहेत. त्यांची जनगणना करण्यात आली नाही, अशा अनेक मुद्दयांवर आ. जयंत पाटील यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. त्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मत्स्यविकासमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, केंद्र व राज्य शासनाच्या योजना मच्छिमारांसाठी राबविल्या जात आहेत. त्यांना लाभ देण्यासाठी प्राधान्य दिले जात आहे. मत्स्य व्यवसाय संबंधित सर्व घटकांच्या विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा पुरविल्या जात आहेत. तसेच अर्थसहाय्य व तांत्रिक मार्गदर्शन केले जात आहे.

रायगड जिल्ह्याचे टोक समजल्या जाणाऱ्या श्रीवर्धन तालुक्यातील जिल्हा मार्ग चार ते महाड तालुक्यातील गालसुरे आडीगाव रस्त्यावरील जावेळे येथील पूल रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येतो. गेल्या तीन वर्षापूर्वी अतिवृष्टीमुळे हा पूल खचला होता. त्यामुळे परिसरातील दहाहून अधिक गावांचा संपर्क तुटला होता. दळणवळणाच्या दृष्टीने ग्रामस्थांची गैरसोय निर्माण होत होती. जिल्हा परिषदेकडे नवीन पूल बांधण्यासाठी पुरेसा निधी नसल्याने जिल्हा परिषदेने तात्पुरत्या स्वरुपात साकव बांधला होता, परंतु पावसाळ्यात या पुलावरून ये - जा करणे धोकायदायक ठरत असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. ही बाब आ. जयंत पाटील यांच्या लक्षात आली. त्यांनी विधान परिषदेमध्ये •➤ पान २ वर

घाऊक निलंबन

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

लोकसभेतील घुसखोरी प्रकरणावरून सोमवारीही विरोधकांनी संसदेच्या दोन्ही सभागृहात गोंधळ घातला. त्यानंतर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी ३३ खासदारांना, तर राज्यसभेचे सभापती जगदीश धनखड यांनी ३४ खासदारांचे निलंबन केले. काही दिवसांपूर्वी लोकसभेतील १३ आणि राज्यसभेतील एका खासदाराचे निलंबन करण्यात आले आहे. ही संख्या आता ८१ वर पोचली आहे.

निलंबित करण्यात आलेल्या खासदारांमध्ये काँग्रेसचे अधीर रंजन चौधरी, डीएमकेचे टी आर बालू, दयानिधी मारन, तृणमूलच्या सौगत रॉय यांचाही समावेश आहे. सोमवारी दोन्ही सभागृहाचे काम काज सुरू झाल्यानंतर विरोधकांनी संसदेच्या सुरक्षेच्या त्रुटीचा मुद्दा उपस्थित केला. त्यावरुन गोंधळ झाल्याने दुपारी बारा वाजेपर्यंत कामकाज तहकूब करावे लागले.

दुपारी बारा वाजता कामकाज सुरू झाल्यानंतर •➤ पान २ वर

- **८१ खासदार निलंबित**
- **घुसखोरी प्रकरणावरून विरोधकांचा आक्षेप**

लोकसभेत १३ डिसेंबरला दोन तरुणांनी घुसखोरी केली होती. तर संसदेबाहेर दोघांनी घोषणाबाजी करत स्मोक स्टीक जाळल्या होत्या. याप्रकरणी आतापर्यंत सहा जणांना अटक करण्यात आली आहे. हिवाळी अधिवेशनाचे कामकाज सुरू असतानाच ही घुसखोरी झाल्याने सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

सरकारविरोधात निंदा प्रस्ताव

। नागपूर । वृत्तसंस्था ।

राज्य विधिमंडळ हिवाळी अधिवेशनात अवकाळी पाऊस आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर दोन दिवस चर्चा होऊनही सरकारकडून अद्याप कोणतेच उत्तर आले नाही. त्यामुळे विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारविरोधात निंदाव्यंजक प्रस्तावाची नोटीस दिली आहे. या प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्यात अतिवृष्टी, दुष्काळ आणि अवकाळी पावसामुळे शेतकरी उद्ध्वस्त झाले आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना सरकारकडून तातडीने मदत कराण्यासंदर्भात ११ डिसेंबर रोजी सभागृहात महाराष्ट्र विधानसभा नियम १०१ अन्वये अल्पकालिन चर्चा करण्यात आली असल्याचे वडेट्टीवार यांनी नार्वेकरांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे. यासंदर्भात विधानसभेत १९ आणि २० डिसेंबर रोजी सर्वपक्षीय चर्चा होणार आहे. विधानसभेतील चर्चेनंतर परंपरेनुसार प्रस्तावावर सभागृहात चर्चा संपल्यानंतर त्या संबंधित

वडेट्टीवार यांचे विधानसभा अध्यक्षांना पत्र

विभागाच्या मंत्र्यांनी त्यास ठोस उत्तर देणे अपक्षित असते. या प्रस्तावावर सभागृहात चर्चा होऊन चार दिवस उलटले असूनही सरकारकडून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर सभागृहात उत्तर दिले नाही. तसेच सरकारकडून शेतकऱ्यांना मदतदेखील करण्यात आलेली नाही. यामुळे सरकार शेतकऱ्यांबाबत उदासीन असल्याने निदाव्यंजक ठराव स्वीकृत करून तो सभागृहात मांडण्याची परवानगी द्यावी, असे वडेट्टीवारांनी विधानसभा अध्यक्षांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे.

अत्याचार, हत्याप्रकरणी अंतिम निकाल डिसेंबरअखेर

। अलिबाग । प्रतिनिधी ।

पेणमधील मळेघर येथील आदिवासी वाडीवरील तीन वर्षाच्या मुलीवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली होती. या गुन्ह्यातील दोषी आदेश पाटील याच्या विरोधात सोमवारी अंतिम सुनावणी होणार होती. मात्र त्याला फाशीची शिक्षा देण्याची मागणी सरकारी वकिलांनी केल्याने ३० डिसेंबरला त्यावर सुनावणी होणार आहे.

आरोपीवर आधीच नऊ गुन्हे दाखल असून समाजात वावरण्यास पात्र नाही, असा युक्तिवाद उज्वल निकम यांनी यावेळी केला. पंजाबमधील तीन खटल्यांच्या निकालाचा आधार घेत आरोपी आदेश •➤ पान २ वर

वाळूची वाहतूक, साडेचार लाखाचा साठा जप्त

। अलिबाग । प्रतिनिधी ।

बेकायदेशीररित्या वाळूची वाहतूक करणाऱ्या ट्रकवर मांडवा पोलिसांनी रविवारी दुपारी कारवाई केली. या कारवाईत ४ लाख ८० हजार रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

आप्पासाहेब कोळी असे या ट्रक चालकाचे नाव आहे. मांडवा बंदराजवळील समुद्रातील वाळू ट्रकमध्ये भरून तो रविवारी दुपारी अलिबागकडे घेऊन जात होता.

मांडवा सागरी पोलिसांनी दस्तुरी नाका येथे सापळा रचून ट्रक अडविला, मात्र ट्रक तसाच रस्त्याच्या बाजूला ठेवून चालक तेथून पसार झाला. समुद्रातील वाळू अवैधरित्या वाहतूक केल्याप्रकरणी ट्रक चालकाविरोधात मांडवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

- **मांडवा सागरी पोलिसांनी केली कारवाई**
- **दस्तुरी नाका येथे सापळा रचून अटक**

पोलिसांनी ट्रकसह वाळू ताब्यात घेतला आहे. पोलिस निरीक्षक गोविंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सुमित खोत अधिक तपास करीत आहेत. मांडवा बंदरापासून •➤ पान २ वर

'महाजनांचे सलीम कुत्ताशी संबंध'

खडसेंनी केली गुन्हा दाखल करण्याची मागणी

। नागपूर । वृत्तसंस्था ।

सलीम कुत्ता याच्याशी गिरीश महाजन यांचे संबंध आहेत. त्यामुळे त्यांच्यावर दहशतवाद विरोधी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) एकनाथ खडसे यांनी केली. त्यामुळे सोमवारी सभागृहात चांगलाच वादंग निर्माण झाला.

ग्रामविकास मंत्री महाजन आणि सलीम कुत्ता यांच्या भेटीचे फोटो समोर आले आहेत. जर बडगुजर यांचे नाव घेतले जाते, मग गिरीश महाजन यांचे नाव का घ्यायचे नाही. महाजन यांचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे, अशी मागणी एकनाथ खडसे यांनी केली. याप्रकरणी उपसभापती •➤ पान २ वर

२० ते २३ डिसेंबरला होणार विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम

पीएनपी संकुलात रंगणार प्रभाविष्कार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील पीएनपी शैक्षणिक संकुलाद्वारे 'प्रभाविष्कार' या सांस्कृतिक सोहळ्याचे २० ते २३ डिसेंबर या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा ठाव घेऊन त्यांच्या अंतर्मनाचा वेध घेणाऱ्या व सर्वांगीण विकासाला वाव देणाऱ्या कार्यक्रमाचे सादरीकरण या सोहळ्यात होणार आहे.

पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या वेश्वी येथील क्रीडा संकुलात मंगळवार (दि.१९) डिसेंबरला क्रीडा ज्योत पेटवून रॅलीला सुरुवात केली जाणार आहे. संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे.

बुधवार (दि.२०) ते शनिवार (दि.२३) डिसेंबर या कालावधीत प्रभाविष्कार सोहळा सायंकाळी सहा ते रात्री दहा या वेळेत रंगणार आहे. २० डिसेंबरला पहिल्या दिवशी सीबीएसई होली चाईल्ड शाळेतील विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शन कार्यक्रम होणार आहे. दुसऱ्या दवशी २१ डिसेंबरला स्टेट बोर्ड होली चाईल्ड स्कूल, तिसऱ्या दिवशी २२ डिसेंबरला प्राथमिक, माध्यमिक मराठी शाळा व बीएड महाविद्यालय आणि २३ डिसेंबरला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी कलागुणांचे सादरीकरण करणार आहेत. या निमित्ताने शेवटच्या दिवशी महागरब्याचे आयोजन केले आहे. या सोहळ्यास टीव्ही मालिकांमधील कलाकार उपस्थित राहणार आहेत. भव्यदिव्य स्वरुपात होणाऱ्या विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा पाहण्यासाठी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन पीएनपी संकुलाच्या वतीने करण्यात आले आहे.

मंगळवार १९ डिसेंबरला क्रीडा रॅलीचे आयोजन

खासदार अमोल कोल्हे ठरणार आकर्षण

पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या संकुलात

२० ते २३ डिसेंबर या कालावधीत प्रभाविष्कार सोहळा आयोजित केला आहे. २३ डिसेंबरला होणाऱ्या कार्यक्रमात लोकप्रिय अभिनेते, खासदार अमोल कोल्हे यांची उपस्थिती असणार आहे. स्टार प्रवाह वाहिनीवरील 'राजा शिवछत्रपती'तसेच झी मराठी वाहिनीवरील'स्वराज्यरक्षक संभाजी' मालिकेतील अभिनेते कोल्हे या कार्यक्रमासाठी आकर्षण ठरणार आहेत.

दाऊदमुळे पाकिस्तानची परिस्थिती अडकित्त्यातील सुपारीसारखी

। अलिबाग । वार्ताहर ।

दाऊद हा पाकिस्तानमध्ये आहे की नाही हे पाकिस्तान सांगू शकत नाही. पाकिस्तानची परिस्थिती दाऊदमुळे अडकित्त्यातील सुपारीसारखी झाली आहे, असे स्पष्ट मत विशेष सरकारी वकील ॲड. उज्वल निकम यांनी मांडले.

मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी दाऊद इब्राहिमवर पाकिस्तानात विषप्रयोग झाल्याची चर्चा समोर समाजमाध्यमांवर जोरात चालू आहे. मात्र त्याच्या मृत्यूबाबत स्पष्टता नाही. एका प्रकरणी

ज्येष्ठ वकील उज्वल निकम

ज्येष्ठ वकील उज्वल निकम हे अलिबाग जिल्हा न्यायालयात उपस्थित होते. त्यावेळी दाऊद इब्राहिमबाबत उज्वल निकम यांनी प्रतिक्रिया दिली. अधिकृतरित्या पाकिस्तान हे मान्य करू शकत नाही की, दाऊद आमच्या भूमीत आहे. हा विषप्रयोग भारताने केला, असेही बोलू शकत नाही. पाकिस्तानची भूमिका आधीपासून दाऊद आमच्या भूमीत नाही, अशी आहे. परवेझ मुशरफ हे भारतात आले तेव्हाही ते असेच बोलले होते, असे ॲड. निकम म्हणाले. पाकिस्तानचे दुटप्पी बोलणे जगासमोर येऊ नये यासाठी पाकिस्तानातील इंटरनेट सुविधा बंद केली आहे. पाकिस्तानमध्ये अंतर्गत यादवी चालू आहे आणि तेथील घटना या जगासमोर उघड होऊ नयेत, अशी त्या देशाची इच्छा आहे. पाकिस्तानमधील पत्रकारांनी हे जाहीर केले आहे. त्यांनी दाऊदवर विषप्रयोग झाल्याचे म्हटले आहे. त्यामुळे पाकिस्तानची नाचक्की झाली आहे. अमेरिकेनेही दाऊदला मोस्ट वॉंटेड दहशतवादी •➤ पान २ वर

एमआयडीसी विरोधात शेतकऱ्यांचा एल्गार

उपविभागीय कार्यालयावर धडकला मुक मोर्चा

। पेण । प्रतिनिधी ।

तालुक्यातील प्रस्तावित डोलवी औद्योगिक विकास प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत भूसंपादन होणार आहे. या भूसंपादनाच्या विरोधात येथील शेतकरी हजारोंच्या संख्येने उपविभागीय कार्यालयावर धडकले.

सकाळी ११ वाजता हुतात्मा स्मारक रामवाडी येथून हुतात्मा स्मारकाचे पुजन करून व मेणबत्ती पेटवून मुक मोर्चाला सुरूवात झाली. पुरूषांबरोबर महिलांची उपस्थिती देखील पहायला मिळाली. मोर्चामुळे कोठेही वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण झाला नाही. वाहतुक सुरळीत चालावी म्हणून उपाययोजना देखील आंदोलकांनी केली होती. शासनाने डोलवी औद्योगिक विकास प्रकल्प घोषित केला. त्यावेळी २,१६८ एकर जमिन भूसंपादन करण्याचे धोरण आखले होते. परंतु शेतकऱ्यांचा तीव्र विरोध पाहता व आमदार जयंत पाटील यांनी विधीमंडळात वेळोवेळी एमआयडीसी डोलवीचा प्रश्न उपस्थित केल्याने या प्रकल्पातून ६० टक्के जमिन वगळण्यात आली. म्हणजेच १,१९८ एकर जमीन डोलवी औद्योगिक विकास क्षेत्रातून वगळलेली असून भविष्यात उरलेली ९७० एकर जमीन देखील या औद्योगिक विकास क्षेत्रातून वगळली होती. ते क्षेत्र देखील रद्द करावे यासाठी आज मुक मोर्चाचे आयोजन केले होते. विविध मागण्यांचे निवेदन प्रांताधिकारी यांना देण्यात आले.

प्रस्तावित डोलवी एमआयडीसी (ता. पेण, जि.रायगड) करीता ३ फेब्रुवारी आणि १५ फेब्रुवारी २०२१ रोजी काढण्यात आलेली ११ गावांसाठीची भुसंपादनाची अधिसुचना पूर्णपणे रद्द करावी, खाऱ्या पाण्याने भिजलेल्या शेतीची नुकसान भरपाई मिळावी, त्याचप्रमाणे खाडीच्या बाह्य काठ्याची व शेतीच्या अंतर्गत बांधबंधिस्तीची दुरूस्ती करावी, ग्रामपंचायत हद्दीतील सरकारी जागा व खाजण तेथील ग्रामस्थांच्या विकास कामाकरीता (गावठाण विस्तार, क्रीडांगण, समाजमंदीर इ.) राखीव ठेवावा, प्रदूषणकारी जेएसडब्ल्यू कंपनीस वाढीव औद्योगिकीकरणास परवानगी देऊ नये, हेटवणे धरणाचे पाणी सिंचनासाठी देऊन शेती दुपिकी करावी अशा विविध मागण्यांचा समावेश आहे.

आमदार जयंत पाटील यांची मोलाची साथ आम्हाला लाभली : निलेश म्हात्रे

डोलवी औद्योगिक विकास क्षेत्र जेव्हा घोषित झाले तेव्हा आम्ही जिल्हयातील सर्व राजकीय नेत्यांकडे मदतीची अपेक्षा केली. परंतु सर्वांनी फक्त आश्वासन दिले. परंतु आमदार जयंत पाटील हे आमच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले त्यांनी विधिमंडळातील लढाई सुरू केली व त्या लढाईला यश देखील आले. कारण मागील अधिवेशनामध्ये तत्कालीन उद्योग मंत्री सुभाष देसाई यांनी स्पष्ट केले की, शेतकऱ्यांचा विरोध असेल, तर जमिनी घेणार नाही. तसेच आज जी ६० टक्के जमीन या औद्योगिक विकास क्षेत्रातून वगळली आहे. त्याचे पूर्ण श्रेय आमदार जयंत पाटील यांना जाते. दोन दिवसांपूर्वी देखील विधिमंडळात डोलवी औद्योगिक विकास क्षेत्र रद्द करण्याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित करून सरकारचे लक्ष वेधले आहे.

समाजकंटकांनी गवतासह वृक्षाला लावली आग

। उरण । वार्ताहर ।

द्रोणागिरी नोड परिसरातील पाणजे गावाला जोडणाऱ्या मार्गावरील गवताला आग लावण्यात आली आहे. या आगीत रस्त्याच्या दुभाजक व कडेला असलेल्या वृक्ष देखील जळून खाक झाले आहेत. सिडको वृक्ष लागवडीसाठी लाखो रुपये खर्च करत आहेत, मात्र अशा घटनांकडे लक्ष देत नसल्याने नाराजीचा सूर आहे. सिडकोने या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

उरण द्रोणागिरी नोड परिसराचा विकास सिडकोच्या माध्यमातून करण्यात येत आहे. त्यामुळे या परिसराचा कायापालट आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी या ठिकाणावरील गवताची छाटणी, विविध प्रकारच्या झाडांचे संवर्धन आणि जतन करण्यासाठी सिडकोकडून लाखो रुपये खर्च करण्यात येत आहेत. परंतु गवत छाटणीचा ठेका घेणारे ठेकेदार हे सिडकोच्या अधिकारी वर्गाच्या डोळ्यात दरवर्षी धूळ फेक करत सिडकोच्या भूखंडावरील गवताची छाटणी न करता त्या गवताला आग लावण्याचे काम करत आहेत, असा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे या परिसरातील झाडे भक्ष्यस्थानी पडून प्रदुषणात वाढ होत आहे. सिडकोचे लाखो रुपये वाया जात आहेत. तर सिडकोने वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांची चौकशी करावी, अशी मागणी सुनील पाटील यांनी सिडकोकडे केली आहे.

पान १ वरून

घाऊक निलंबन

पुन्हा विरोधकांकडून घोषणाबाजी सुरू झाली. त्यामुळे दुसऱ्यांदा कामकाज तहकूब करण्याची वेळ आली. ओम बिर्ला यांनी विरोधकांना या प्रकरणाचे राजकारण न करण्याचे आवाहन करत शांत राहण्यास सांगितले. पण विरोधी बाकांवरील सदस्य आक्रमक असल्याने दुपारी दोन नंतर दिवसभरासाठी काम काज तहकूब करण्यात आले.

विरोधी बाकांवरील खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी सभागृहात येऊन भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली.

विरोधकांकडून त्यावरून सरकारला धारेवर धरले जात आहे. गोंधळामुळे १४ डिसेंबरला लोकसभेचे १३ आणि राज्यसभेच्या एका खासदारांना निलंबित करण्यात आले होते. आता एकाच दिवशी मोठ्या संख्येने खासदारांचे निलंबन करण्यात आल्याने विरोधकांना मोठा धक्का बसला आहे.

जावेळे पूल नव्याने बांधणार

सोमवारी या प्रश्नांतून सभागृहाचे लक्ष वेधले. अतिवृष्टीत जीर्ण झालेल्या पुलाला तीन वर्षे झाली असून अद्यापपर्यंत त्याची पुनर्बांधणी करण्यात आली नाही. तातडीने पुनर्बांधणी प्रस्तावाला मान्यता देऊन निधी उपलब्ध करण्यात यावा, त्याचे काम तातडीने सुरु करावे, अशी मागणी केली. त्यांच्या या मागणीला बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दुजोरा देत लवकरच कामाला सुरुवात करण्यात येईल असे आश्वासन यावेळी दिले.

आदिवासींच्या प्रश्नांकडे वेधले लक्ष

भारत जोडो अभियान व शोषित जन आंदोलन यात्रेंतर्गत विविध प्रश्न सोडविण्यासाठी आदिवासी, शेतमजूर, शेतकऱ्यांनी १२ सप्टेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. आदिवासी समाजाच्या विकासासाठी असणारा निधी वापरला जात नसल्याने तो परत जात आहे. त्याचा परिणाम आदिवासी समाज योजनांपासून वंचित राहू लागले आहे. त्या निधीचा योग्य वापर करण्यात यावा, ठाकूर, आदिवासी समाजाला शिक्षणासाठी लागणारे जातीचे दाखले मिळवून देण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. मात्र अद्यापपर्यंत त्यांच्या मागणीची दखल घेण्यात आली नसल्याचे विधानपरिषदेत आ. जयंत पाटील यांनी सांगत सभागृहाचे लक्ष वेधले. यावेळी मंत्री विजयकुमार गावित म्हणाले, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील अधिकारी, समाजकल्याण सहाय्यक आयुक्त यांना या प्रश्नांबाबत कळविण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित मुद्दयांवर कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले.

'महाजनांचे सलीम कुत्ताशी संबंध'

नीलम गोऱ्हे यांनी एसआयटी चौकशी स्थापन करण्याचे आदेश द्यावेत, असेही खडसे म्हणाले. एकनाथ खडसे यांच्या मागणीनंतर विधानपरिषद सभापती नीलम गोऱ्हे यांनी गिरीश महाजन यांचे सलीम कुत्तासोबतचे फोटो एकनाथ खडसेंनी दाखवू नयेत, असे निर्देश दिले. नीलम गोऱ्हे यांनी एकनाथ खडसे यांनी मांडलेली २८९ ची चर्चा फेटाळून लावली.

सलीम कुत्ता प्रकरणात भाजपकडून शिवसेना ठाकरे गटावर टीका केली जात असताना आता खडसे यांनी महाजन यांच्यावर निशाणा साधला आहे. त्यामुळे सलीम कुत्ता प्रकरणात राजकीय वातावरण चांगलेच तापणार असल्याचे दिसून येते.

वाळूची वाहतूक, साडेचार लाखाचा साठा जप्त

काही अंतरावर समुद्रात बेकायदेशीररित्या वाळू उत्खनन करून तिची वाहतूक केली जात होती. स्थानिकांनी अनेक वेळा महसूल विभागाकडे तक्रारी करून देखील उत्खनन करणाऱ्यांसह वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. आता मांडवा सागरी पोलिसांनी केलेल्या कारवाईबाबत समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

अंतिम निकाल डिसेंबरअखेर

पाटील याला फाशी देण्यात यावी अशी मागणी ॲड. उज्ज्वल निकम यांनी न्यायालयाकडे केली.

आरोपीच्या वकीलांनी जन्मठेप मिळावी. यासाठी युक्तिवाद केला. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद न्यायालयाने ऐकला असून या खटल्याचा निकाल राखून ठेवला आहे. त्यामुळे पेण येथील अत्याचार आणि हत्या प्रकरणातील अंतिम निकाल हा ३० डिसेंबर रोजी जिल्हा मुख्य न्यायाधीश अजय एस. राजंदेकर देणार आहेत.

हा गुन्हा जलदगतीने न्यायालयात चालविण्यासाठी राजकीय तसेच सामाजिक संघटनांनी मागणी केली होती. या खटल्यासाठी विशेष सरकारी वकील म्हणून ॲड. उज्वल निकम यांची नियुक्ती राज्य शासनाने केली आहे.

दाऊदमुळे पाकिस्तानची परिस्थिती अडकित्त्यातील सुपारीसारखी

म्हणून जाहीर केले आहे. कारण दाऊद हा अल कायदा या दहशतवादी संघटनेला मदत करीत होता, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

मुंबईमध्ये १९९३ साली झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणात दाऊद हा आरोपी होता. दुबई येथे हा कट रचण्यात आला होता. या कटात कोण कोण सामील होत. याचा खुलासा कटात सामील असलेल्या एका आरोपीला माफीचा साक्षीदार बनवून न्यायालयात केला होता. या आरोपीने कट कसा रचला, पाकिस्तानमध्ये कसे नेले, पाकिस्तान विमानतळावर पासपोर्ट कसे तपासण्यात आले नाहीत. यावरून पाकिस्तान सरकारचे त्यांना सहाय्य होते, ही बाब स्पष्ट होते. त्यावेळी भारताशी युद्ध केल्याचा आरोप करण्यात आला नाही. मुंबई पोलिसांनी हा आरोप लावला, मात्र नंतर तो मागे घेण्यात आला. याला अनेक कारणे असू शकतात. त्यानंतर दाऊद हा दहशतवादी म्हणून हवा होता, तो मिळत नव्हता. आम्ही म्हणत होतो तो पाकिस्तानमध्ये लपला आहे. मात्र ते नाकारत होते. आता लबाड लांडग्याचे पाकिस्तानचे ढोंग उघडकीस आले आहे, असेही निकम म्हणाले.

दुचाकीची कारला धडक

ठाण्यात दिली. या अपघातात दुचाकीस्वार उमाकांत फाळके यांना गंभीर दुखापती होऊन त्यात त्यांचा मृत्यू झाला. सदर अपघाताच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलिस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव पोलिस करीत आहेत.

डॉलरच्या बदल्यात दोन लाखांची फसवणूक

तसेच गरज असल्याने या नोटांच्या बदल्यात भारतीय रुपये पाहिजे असल्याचे त्याने सांगितले. दोन लाख भारतीय रुपयांच्या बदल्यात हे डॉलर देण्यास त्याची एक नातेवाईक तयार असल्याचे त्याने सांगितले. हा व्यवहार पूर्ण करण्यासाठी त्याने घणसोलीनजीक एका ठिकाणी गुलफाम यांना बोलावले.

स्वस्तात एवढी मोठी रक्कम मिळते म्हणून गुलफाम याने पत्नीचे दागिने गहाण ठेवत दोन लाख रुपये जमा केले व घणसोली येथे ठरल्याप्रमाणे गेले. त्याठिकाणी फोनवर बोलणारी व्यक्ती आणि त्याच्यासोबत अन्य एक तरुण आला होता. गुलफाम यांनी दोन लाख रुपये दाखवत असतानाच त्याने हे पैसे पटकन हातात घेतले व डॉलरचे पुडके त्यांच्या पिशवीत टाकले. त्यानंतर आरोपी तेथून गेल्यावर जेव्हा पिशवीतील डॉलरचे पुडके गुलफाम यांनी पाहिले तेव्हा केवळ वर एक डॉलरची नोट, तर त्याखाली नोटेच्या आकाराचे कागदी पुडके होते. याबाबत रबाळे पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

न्या. शिंदे समितीचा दुसरा अहवाल राज्य सरकारला सादर

उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. यापूर्वी न्यायमूर्ती शिंदे समितीचा पहिला अहवाल राज्य सरकरकडे ३१ ऑक्टोबर २०२३ ला सादर केला होता.

दरम्यान, अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षण आंदोलनाची पुढची दिशा ठरवण्यासाठी राज्यव्यापी सकल मराठा समाजाची बैठक रविवारी आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी या बैठकीला मार्गदर्शन करताना एका मोठ्या आंदोलनाच्या तयारीला लागा, असे आवाहन उपस्थितांना केले. त्यामुळे त्यानंतर लगेचच सोमवारी शिंदे समितीने दुसरा टप्प्यातील अहवाल सादर केला.

अलिबाग नगरपरिषद
आरोग्य विभाग

फेर ई-निविदा सूचना सन २०२३-२४

अलिबाग नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील फेर ई-निविदा सूचनेमध्ये अलिबाग नगरपालिकेच्या हद्दीमधील कुत्र्यांचे निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करून रेबीज लस टोचणेबाबत फेर ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई-निविदा सूचना शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १९/१२/२०२३ पासून उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

सही/-
मुख्याधिकारी,
अलिबाग, नगरपरिषद

ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा
ता. माणगाव, जि. रायगड

नोटीस बोर्ड प्रसिद्ध दि.१४/१२/२०२३

निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा खालील कामाकरीता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छीत ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तसेच सदरचे निविदा व दरपत्रक दि.२२/१२/२०२३ पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय मोर्बा येथे दुपारी १.०० वाजेपर्यंत सादर करावे.

अ. क्र.	कामाचे नाव	योजनेचे नाव	अंदाजपत्रक रक्कम	काम पूर्ण करावयाचा कालावधी	१% इसारा रक्कम	कोरे निविदा फॉर्म फी
१	मोर्बा अंतर्गत गटार (२२/२३) बांधणे	१५ वा वित्त	४.०० लक्ष	३ महिने	४०००	२००/-
२	मोर्बा अंतर्गत रस्ते दुरूस्ती	ग्रामनिधी	१५४१६९	१ महिने	१५४२	२००/-
३	महादपोली बौद्धवाडी शौचालय दुरूस्ती	ग्रामनिधी १५% खर्च	८७१४४	३ महिने	८७२	२००/-

अटी व शर्ती -

१) प्राप्त निविदा दि.२२/१२/२०२३ रोजी दु.१.०० वाजता ग्रा.प.मोर्बा येथे उपस्थिताच्या समक्ष मा.सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येतील.

२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच मोर्बा यांनी राखून ठेवला आहे.

३)प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रक्कमा कपात केल्या जातील. मा. उपभियंता सा. बांधकाम उपविभाग माणगाव याचेकडील तांत्रिक अधिकारी व प.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे पदाधिकारी/सदस्य याचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून, काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवला आहे.

४) कामाचे देयकातून शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.

५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदाचा विचार केला जाईल.

सही/-
ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा
ता.माणगांव जि.रायगड

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा
ता.माणगांव जि.रायगड

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

Sr. No.	Tender No.EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/	Description	Estimated cost in lakhs	Submission date
1	E-Tender-24/23-24/ Rfx No.7000029131	E-tender for work of providing tower earthing of 400 kV Nagothane Dabhol 1 & 2 ckt under 400 kV line Maint s/dn under 400 KV RS (O & M) Division Nagothane...**1st Ext..**	**Rs. 21,37,250/-**	**25.12.2023 up to 23.59 hrs**

EMD 1% of Estimate cost & Tender fee Rs. 500/- + GST for further details visit our website https://srmtender.mahatransco.in/ Contact Person: Mitesh Goyal (DYEE) Mob No. 9461456635 Email ID: ee7230@mahatransco.in **Note:** All eligible supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
EXECUTIVE ENGINEER
400kV R.S. (O&M) Dn. Nagothane

श्री. इंदलकर साहेब कार्ट

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज १६०९/२०२३, नि.७/ड, ने.ता.२९/०१/२०२४

१) श्रीमती निराबाई नामदेव पाटील, वय-६५ वर्षे, धंदा - गृहिणी
२) श्री. अशोक नामदेव पाटील, वय - ५२ वर्षे, धंदा- नोकरी/व्यवसाय
वरील अनु. क्र.१ व २ रा. कोंबडभुजे, वरची आळी,
पो. उलवे. तरघर, ता. पनवेल, जि. रायगड
३) श्री. अनिल नामदेव पाटील, वय - ४१ वर्षे, धंदा- नोकरी/व्यवसाय,
रुम नं. बी-००१, खुशाल स्मृती बिल्डींग, मुखंड क्र. ११७२,
११७२/१, उरण रोड, ता. पनवेल, जि. रायगड
४) सौ. सुनिता कान्हा वास्कर, पुर्वाश्रमाची सुनिता नामदेव पाटील
वय- ४८ वर्षे, धंदा- गृहिणी
रा. कुंडेवहाळ, ता. पनवेल, जि. रायगड
५) सौ. मनिषा अशोक मोकळ, पुर्वाश्रमीची मनिषा नामदेव पाटील
वय- ४५ वर्षे, धंदा- गृहिणी
रा. न्हावाखाडी, ता. पनवेल, जि. रायगड
} **अर्जदार**

विरुध्द

कुणीही नाही **सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. नामदेव बाबु पाटील हे दि. ०२/०७/२०२३ रोजी रुम नं. २०२, बालाजी दर्पन, प्लॉट नं. १९, सेक्टर ०२, उलवे नोड, वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांच्या मालकीची व ताबे कब्जात वहिवाटीतील मिळकत खालील वर्णन केल्याप्रमाणे :

मौजे उलवे व तरघर, ता. पनवेल, जि. रायगड येथील नवी मुंबई प्रकल्पाकरिता १२.५ टक्के योजनेअंतर्गत संपादित करण्यात आलेली मिळकत खालीलप्रमाणे आहे.

अ) मिळकतीचे वर्णन

अ.नं.	गावाचे नाव	अवार्ड युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर. पै.
१	उलवे	१४+२३८	२९	४	०-०९-०
			१०	९	०-१४-०
			१०	३	०-११-०
				एकूण	०-३४-०
२	तरघर	६१ क	१००	६	१-०३-५
३	तरघर	६१ अ	८७	७	०-१८-८

ब) मिळकतीचे वर्णन

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ करिता संपादित करण्यात आलेल्या मौजे तरघर-कोंबडभुजे येथिल निवासी बांधकाम क्र. केबी ९५ व ९५अे या घराच्या बदल्या सिडकोकडून वाटप करण्यात आलेला पुष्पक नगर येथे भुखंड क्र.१८, सेक्टर २५ अे, क्षेत्र ३२०.०० चौ.मी. भुखंडापैकी कै. नामदेव बाबु पाटील यांच्या हिश्श्याकरिता येणाऱ्या मिळकतीबाबत.

सबब वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेचे तारखेपासुन ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे. कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होऊन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे. कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही. तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करुन पुरावा घेऊन मे. कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १५/१२/२०२३

शिक्का

सहा. अधीक्षक,
दिवाणी न्यायालय क. स्तर पनवेल

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे भाल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत जमिनीचे विद्यमान मालक श्रीमती. सुमन संतोष करूळकर, रा. थळ आगर गणेश गल्ली, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायमस्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार
भाल	७०/३	०-४९-०० पो.ख. ०-०३-०० ०-५२-००	०.९२
भाल	७०/४	०-३६-०० पो.ख. ०-०३-०० ०-३९-००	०.६९
भाल	७५/१	०-११-९० पो.ख. ०-००-२० ०-१२-१०	१.६२
भाल	७५/३	०-७८-२० पो.ख. ०-०८-८० ०-८७-००	१५.१३

या मिळकतीपैकी विद्यमान मालक श्रीमती. सुमन संतोष करूळकर यांच्या मालकीचा अविभक्त हिस्सा या खरेदीखताचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक श्रीमती. सुमन संतोष करूळकर यांचे हिश्याची निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस पूर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. व त्या अनुषंगाने मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती. सुमन संतोष करूळकर यांनी आमच्या अशिलांशी दिनांक २७/०९/२०२३ रोजी अविभक्त हिश्याच्या नोटरी साठेकरार केलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहीत लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे. असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक- १६/१२/२०२३

सही/-
ॲड. प्रशांत रामचंद्र म्हात्रे
मो.नं. ९८२२०१७१६१

जाहीर नोटीस

याद्वारे सामान्य जनतेला नोटीस देण्यात येत आहे की, आमचे अशिल इच्छुक असल्याने आम्ही १) श्री. एकनाथ महादेव थळे, २) श्री. जयवंत महादेव थळे, ३) श्री. नंदकुमार महादेव थळे, ४) श्रीमती रेखा किसन थळे, ५) श्री. संजय किसन थळे, ६) श्री. राकेश किसन थळे, ७) श्रीमती ललिता बळीराम थळे उर्फ सुनीता बळीराम थळे, ८) श्री. प्रविण बळीराम थळे, ९) श्री. किरण बळीराम थळे, १०) श्रीमती सुजाता बळीराम थळे, ११) श्रीमती सुरेखा गोपीनाथ थळे, १२) श्री. नितीन गोपीनाथ थळे, १३) श्री. सागर गोपीनाथ थळे, १४) श्रीमती नीलिमा किसन थळे उर्फ सायली संतोष बाईत, १५) श्रीमती यशवदा उर्फ यशोदा यशवंत थळे, १६) श्रीमती दिपिका दिलीप मंचेकर, १७) श्रीमती अरूणा अरूण पानसरे, १८) श्रीमती. मीनल मनोहर जाधव, १९) श्रीमती. रोहिणी रघुनाथ पोसम, २०) श्रीमती. हर्षदा हरीश उर्फ हरेश्वर पाटील, (मालक) यांच्या मालमत्तेची विशेषतः खाली दिलेल्या परिशिष्ट मध्ये वर्णन केलेल्या मालमत्ता याची चौकशी करत आहोत,

या मालमत्तेबाबत विक्री, देवाणघेवाण, भाडेपट्टे, भाडेकरू, परवाना, ट्रस्ट या मार्गाने किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या विरोधात/वर/संबंधात/विरूद्ध/वर/आक्षेप, हक्क, हित, हक्क, मागणी आणि/किंवा आक्षेप असलेली सर्व किंवा कोणतीही व्यक्ती वा संस्था, धारणाधिकार, देखभाल, सुलभता, वारसा, ताबा, संलग्न, गहाण, शुल्क, भेट, लिस-पेंडन्स, वहिवाट, एफ.एस.आय., भूसंपादन. वापर किंवा अन्यथा कोणत्याही स्वरूपाचे आणि कोणत्याही प्रकारे झुंजारराव अँड कंपनीला त्याची लेखी सूचना खालील पत्त्यावर देण्याची विनंती केली आहे. विक्रांत झुंजारराव अधिवक्ता आणि सॉलिसिटर, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ अशा हक्क, शीर्षक, व्याज, दावा, मागणी किंवा आक्षेपांच्या समर्थनार्थ कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, असे न झाल्यास असा कोणताही दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नाही असे गृहीत धरले जाईल आणि जरी असा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असला तरीही, असे मानले जाईल. दावेदाराने असा दावा, मागणी किंवा आक्षेप सोडला आहे आणि/किंवा असा दावा, मागणी किंवा आक्षेप वापरण्याचा कोणताही अधिकार सोडला आहे आणि ते आमच्या अशील यांचेवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर विचार केल्याप्रमाणे खरेदी व्यवहारात पुढे जाऊ शकतात.

परीशिष्ट
(मालमत्तेचे वर्णन)

मौजे	भूमापन क्रमांक/ उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पैसे)
नारंगी ता. अलिबाग	६३/२	जिरायत ०१.२९.७० वरकस ००.११.१० पो.ख. ००-१८-८० एकूण ०१-५९-६०	२९.८१

वर नमूद मिळकतीपैकी ०१.४२.१० हे.आर. क्षेत्र (विक्रेते यांचा अविभक्त हिस्सा व अधिकार) सदर मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १९/१२/२०२३

झुंजारराव अँड कंपनी करीता
अँड. विक्रांत झुंजारराव

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. विजय दामोदर राऊत,२) श्रीमती. सुमती लक्ष्मण काठे,३) श्रीमती. आशा अनंत राऊत,४) श्री. प्रेमानंद वसंत ठाकूर,५) श्री. जितेंद्र वसंत ठाकूर ६) सौ. चित्रा देवेंद्र पुरो यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू. पै.)
मापगांव	१३४	०-४४-९० पो. ख.०-१०-१० ०-५५-००	११.६९

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकीहक्कांची व प्रत्यक्ष ताबेकैंजा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्कअधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकती वरअथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे

क्षणिक

परिक्रमेसंबंधी आज बैठक

चौल : अलिबाग तालुक्यातील चौल-भोवाळे येथील दत्त टेकडीला परिक्रमा करण्यात येणार आहे. गुरुवार, दि. २१ डिसेंबर रोजी दुपारी तीन वाजता परिक्रमेस प्रारंभ होईल, अशी माहिती वार्डे गुरुजी आरती मंडळ, चौल यांच्याकडून देण्यात आली आहे. या परिक्रमेच्या नियोजनासाठी उद्या मंगळवार, दि. १९ डिसेंबर रोजी चौल-सागमळा (एस नाईक आळी) येथील राकेश नाईक यांच्या निवासस्थानी सायंकाळी ७ वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले असून, दत्तभक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अनोळखी इसमाचा मृतदेह

पनवेल : खारघर रेल्वे स्टेशन ते मानसरोवर रेल्वे स्टेशन दरम्यान एका इसमाचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत. एका अज्ञात इसमाला लोकल गाडीची ठोकर बसून त्यात तो गंभीररीत्या जखमी होऊन मयत झाला आहे. सदर इसमाचे अंदाजे वय पन्नास वर्ष, उंची पाच फूट तीन इंच, अंगाने सडपातळ, रंगाने निमगोरा, चेहरा उभट, नाक सरळ, केस काळे व पांढरे, दाढी वाढलेली असून, उजव्या हातावर मराठीत शंकर असे गोंदलेले आहे.

अज्ञाताकडून रिक्षाची चोरी

नवी मुंबई : नवी मुंबईतील वाशी येथील रिक्षाचालकाच्या रिक्षेची अज्ञाताकडून चोरी करण्यात आली आहे. मारुती कलवडे असे रिक्षा चालकाचे नाव आहे. तो एपीएमसी येथे एक प्रवासी भाडे घेऊन गेला होता. सदर प्रवासी भाडे सेक्टर १९ येथील रेस बारच्या नजीक सोडले. नेमके तेथेच एका ठिकाणी यांना त्यांचा मित्र दिसला. त्यामुळे त्यांनी रिक्षा (एमएच. ०२ ए एफ ५०१८) तेथेच रस्त्याच्या कडेला उभी करुन काही अंतरावर गप्पा मारत उभे होते. दम्यान, अज्ञाताकडून रिक्षेची चोरी केली.

जुगार अड्ड्यावर कारवाई

पनवेल : सिडको टेकडी गार्डन ए टाईप वसाहत, सेक्टर १३, नवीन पनवेल येथे काही जण मोबाईल फोनद्वारे कल्याण बाजार जुगार चालवत असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी या ठिकाणी छापा मारला असता तेथे अकबर महामुद जोगीलकर (मुस्लिम नाका, पनवेल) व संदीप सिंग हे दोघे मोबाईल फोनच्या सहाय्याने ग्राहकाकडून पैसे घेऊन कल्याण बाजार जुगार चालवत असल्याचे आढळले. त्यावर पोलिसांनी त्यांच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

चार लाखांची रोकड लंपास

पनवेल : भरत विश्वकर्मा त्यांचे ट्रक रेफ्रिजरेशन पॉइंट नावाचे नावडा फाटा येथे ट्रक गॅरेज आहे. यांच्याकडे अशोक लेलँड कंपनीचा ट्रक होता. त्यांनी तो दहिसर मोरीच्या भंगारवाल्याला विकला. त्यांनी त्याचे पैसे गॅरेजच्या कंटेनर केबिनमध्ये ठेवले होते. हे पैसे ठेवताना येथील अरबाज खानने पाहिले होते. त्यानंतर भरत विश्वकर्मा केबिनला लॉक करून तळोजा एमआयडीसी येथील आरके मोटर गॅरेजमधील हंसराज यांच्याकडे कामासाठी गेले होते. तेथून ते परत आले असता त्यांना केबिनचे कुलूप तुटून पैसे लंपास झाल्याचे दिसले.

देवळ धरण कोरडेठाक

दुरुस्तीच्या नावाखाली करोडो रुपये पाण्यात

। पोलादपूर । शैलेश पालकर ।

तालुक्यातील आगामी धरणप्रकल्पांना मारक ठरलेला देवळे लघुपाटबंधारे योजनेचा धरण प्रकल्प आतापर्यंत कोट्यवधी रूपये खर्च होऊनही प्रत्यक्षात कोरडा असताना या योजनेच्या दुरूस्तीसाठी १ कोटी ३३ लक्ष रूपयांचे अंदाजपत्रक २००९ मध्ये मुख्य अभियंता स्थानिक स्तर प्रदेश, पुणे यांच्याकडे २००९ मध्ये पाठविण्यात आले. अंदाजपत्रकाची शेरेपूर्तता होऊन अंदाजपत्रकास मंजुरी मिळताच धरणाच्या दुरूस्तीचे काम करण्याचा प्रस्ताव अधीक्षक अभियंता लघुपाटबंधारे स्थानिक स्तर मंडळ ठाणे यांनी सादर केल्याची माहिती एका अहवालामध्ये नमूद केली.

देवळे लघुपाटबंधारे योजनेला मूळ प्रशासकीय मान्यता ३१ मार्च १९८१ रोजी केवळ ३२ लाख ६० हजार ४९६ रूपयांची असून, एप्रिल १९९४ मध्ये ग्रामविकास व जनसंधारण विभागाकडे ही योजना हस्तांतरीत झाली तेव्हा कामासाठी १ कोटी ६६ लाख ५२ हजार २९४ रूपये आणि अनुषंगिक खर्चापोटी ४२ लाख २ हजार ८९० रूपये अशी एकूण २ कोटी ८ लाख ५५ हजार १८४ रूपये अशी सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली. योजनेच्या दुसऱ्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये कामासाठी ४ कोटी ६८ लाख १ हजार ८७६ रूपये आणि अनुषंगिक खर्चापोटी ६८ लाख ९६ हजार ८५५ रूपये अशी एकूण ५ कोटी ३६ लाख ९८ हजार ७३१ रूपये अशी मंजुरी ३१ मार्च २००५ रोजी मिळाली. या देवळे लघुपाटबंधारे योजनेचे काम ब-१ निविदांवर तीन टप्प्यांत व्ही.एस. हांडा आणि आर.के. कन्स्ट्रक्शन या पुणे येथील कंपन्यांना देण्यात आले. या कामाची सुरूवात मार्च १९९७ मध्ये झाली. मात्र, बुडीत क्षेत्रातील शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम न मिळाल्याने तसेच भूसंपादनात जमिनीचा दर कमी लावल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी १९९८ मध्ये योजनेचे काम बंद केले होते. यानंतर एस.पी. रेड्डी यांना विभागीय कार्यालयामार्फत पत्र देऊन सबलेटिंग करण्यास मंजुरी दिली. साधारणत: २००१ मध्ये प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला अदा केल्यानंतर मे २००३मध्ये योजनेचे घळभरणीचे काम पूर्ण करून पाणीसाठा करण्यास सुरूवात केली. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांच्या मान्यताप्राप्त काटछेदानुसार ३० मीटर लांब आणि २३५ मीटर पात्रावरील मातीचा भराव घालून देवळे लघुपाटबंधारे योजनेच्या धरणाची उंची २९.३० मीटर करण्यात आली आहे. यातील मुख्य विमोचक सलोह संधानक पध्दतीचा असून, त्याचा ॲप्रोच कंडयूट ७१.२० मीटर लांबीचा आहे. याचे काम दगडी बांधकामात करण्यात आले आहे.धरणाच्या विहिरीचा आतील व्यास ३ मीटर असून, विहीर आरसीसी पद्धतीने बांधण्यात आली आहे. मुख्य विमोचकाचे काम धरणाच्या दरवाजासह पूर्ण झाले आहे. मात्र, हे काम पूर्ण झाल्यानंतर या धरणात पाणीसाठा होत असल्याची चाचणी घेतल्या-घेतल्याच धरणाची गळती सुरू झाल्याची माहिती ग्रामस्थांनी प्रस्तुत प्रतिनिधीस दिली.

आटणारे पाणी आणि धरणफुटीचा धोका

२००३ पासून आजतागायत पावसाळा संपताच धरणातील पाणीसाठा आटून जातो, तर २०२१ साली अतिवृष्टीमुळे या धरणाचा बॅकवॉटरचा साठा पूर्णपणे भरून वाहू लागला असताना धरणाचा २३५ मीटर लांबीच्या पात्रावरील ३० मीटर लांब आणि २९.३० मीटर उंचीचा भराव बॅकवॉटरच्या प्रेशरमुळे ढासळून देवळे गावठाणापासून पात्रालगतची लोकवस्ती वाहून जाण्याचा धोका निर्माण झाला होता. मात्र, धरणाच्या दरवाजाची चावी फिरविण्याची माहिती असलेल्या व्यक्तीने वेळीच सांडवा खुला केल्याने धरणाचा भराव वाहून आपत्ती निर्माण होण्याऐवजी योग्यप्रकारे पाण्याचा विसर्ग होऊन मोठी दुर्घटना टळली होती. या धरणाच्या भरावावर दगडी पिचींग करण्यात आले असून, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात खेकडी वावरताना दिसून आल्याने २०१९ साली तत्कालीन तहसीलदार दिप्ती देसाई यांनी तिवरे धरणफुटीच्या पार्श्वभूमीवर या धरणाची पाहणी केली होती.

कालव्यांचे फक्त अंदाजपत्रक

या देवळे लघुपाटबंधारे योजनेच्या धरणातून उजवा तीर कालव्याच्या कामाचे अंदाजपत्रक २००४-०५ ची दरसूची वापरून ६१ लाख ५८ हजार २०१ रूपये करण्यात आले होते. तर डाव्या तीर कालव्याचे अंदाजपत्रक २१ लाख १२ हजार ३५५ रूपये करण्यात आले होते. त्यास ७ एप्रिल २००५ अन्वये तांत्रिक मान्यताही प्रदान करण्यात आली. मात्र, पुढे कोणतीही कार्यवाही झाली नाही. या योजनेच्या बुडीत क्षेत्र व पायाक्षेत्रासाठी १२.९१.४ हेक्टर क्षेत्र संपादित करून भूसंपादनानंतर संबंधित प्रकल्पग्रस्तांना मोबदलेही प्रदान करण्यात आले असल्याचे या अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे.

प्रशासनाची अनास्था

मुख्य धरणासह मुख्य विमोचकामधून मोठया प्रमाणात गळती असल्याचे या अहवालामध्ये नमूद करण्यात होते तरीही पावसाळयानंतर अल्पावधीतच हे धरण कोरडे पडत असल्याचा उल्लेख या अहवालात टाळण्यात आला होता. २००९ मध्ये गळती थांबविण्याच्या हेतूने करण्यात आलेल्या दुरूस्ती प्रस्तावाची सद्यः स्थिती पाहण्याची कोणतीही मानसिकता या विभागाकडे नसल्याने तालुक्यातील अन्य ठिकाणी होऊ पाहणारे धरणप्रकल्प ग्रामस्थांच्या विरोधामुळे प्रस्तावित होत नसल्याचे नमूद करून तब्बल १० वर्षांनंतर नारळफोडी करून भूसंपादनाच्या मोबदल्याविनाच जमिनीवरील झाडे आणि दगडी तसेच माती उत्खननाची सुरूवात झाली आहे.

नेरळ-माथेरान घाटरस्ता धोकादायक



- सा.बां. खात्याचे दुर्लक्ष
- संरक्षक कठडे, रेलिंग बसविण्याचा विसर

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानकडे जाणारा नेरळ-माथेरान हा सात किलोमीटरचा घाटरस्ता नागमोडी आणि अवघड वळणांचा असून, वाहनचालकांसाठी मोठ आव्हान आहे. अनेकदा रस्त्याचा अंदाज न आल्याने अपघात होत आहे. या रस्त्याला सुरक्षित कठडे अथवा लोखंडी रेलिंग बसविण्याची मागणी वारंवार करण्यात येत आहे. परंतु, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

मुंबई, पुण्यापासून जवळचे माथेरान हे पर्यटनस्थळ असल्यामुळे नेहमीच इथे पर्यटकांची गर्दी पहावयास मिळते. नेरळ ते माथेरानदरम्यान मिनिट्रेनच्या फेऱ्या कमी असल्याने अनेक पर्यटक आपली स्वतःची मोटार वाहने आणतात. नेरळ ते माथेरान हा सात किलोमीटरचा घाटरस्ता खूपच नागमोडी आणि अवघड वळणाचा असल्याने नवख्या वाहन चालकांना एकप्रकारे आव्हानच असते. दुचाकी तसेच चारचाकी वाहने चालविताना घाटरस्त्याचा अंदाज येत नाही, त्यामुळे याठिकाणी अपघात घडत आहेत. त्यातच वॉटर पाईप स्टेशनखालील अरुंद वळणावर सुरक्षित कठडे अथवा लोखंडी रेलिंग नसल्याने याच ठिकाणी अनेकदा अपघात घडले आहेत. पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभाग कोणतीच कार्यवाही करीत नाही, असा आरोप स्थानिकांसह वाहनचालकांकडून करण्यात येत आहे. वॉटर पाईप स्टेशनखालील अरुंद वळणावर नेहमीच अपघात घडत असतात. चालकांना या अवघड वळणाचा अंदाज येत नाही, त्यामुळे अपघात घडतात. सार्वजनिक बांधकाम खाते अजून किती अपघात होण्याची वाट पाहणार आहेत, अशी विचारणा प्रवाशांकडून होत आहे.

या रस्त्याचे एमएमआरडीच्या माध्यमातून नूतनीकरण करत असताना अनेक ठिकाणी चढाव कमी करून रुंदीकरण करणे अपेक्षित होते. तसेच जुन्याच रेलिंग वर आरसीसी करून निविदेमधील रक्कम संपविण्याचे काम केले. ज्या ठिकाणी अपघात होतात त्या ठिकाणी नवीन रेलिंगसुद्धा न टाकता त्याच्या पुढील ५० मीटर रस्त्यावर रुंदीकरण केलेले नाही.

– शिवाजी शिंदे, माजी विरोधी पक्षनेते, माथेरान नगरपालिका

घाटरस्त्यातून गाडी चालविणे म्हणजे एक मोठे आव्हान उभे असते. काही ठिकाणी खूपच अवघड वळणे आहेत, त्यामुळे समोरून येणारे वाहन दिसत नाही. ठराविक जागी रेलिंग तुटलेल्या आहेत तिथे संबंधित खात्याने उपाययोजना करावी.

– शाम सारंगे, पर्यटक, मुंबई

मी अनेकदा या घाटरस्त्यामध्ये गाडी घेऊन आलो आहे. अति चढाव असून, अरुंद वळणाच्या मार्गावर समोरून येणारे वाहन दिसण्यासाठी आरसे लावल्यास वाहनांचा अंदाज येऊ शकतो.

– हृषीकेश पानसरे, पर्यटक, मुंबई

संत सेवालाल महाराज प्राणप्रतिष्ठा सोहळा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग बंजारा समाजाच्यावतीने श्री संत सेवालाल महाराज यांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा व श्री माता पोहरादेवी उत्सवानिमित्त शोभा यात्रेचे आयोजन अलिबाग-शास्त्रीनगर (कोळीवाडा) येथे करण्यात आले होते. या सोहळ्यानिमित्त माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी भेट दिली. सेवालाल महाराज व पोहरा देवीचे त्यांनी दर्शन घेतले.

यावेळी नगरपरिषदेचे माजी सदस्य अनिल चोपडा, माजी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, ॲड. गौतम पाटील, अजय झुंजारराव, वृषाली ठोसर, शैला भगत, जयश्री पेरेकर, महेश शिंदे, प्रशांत आंबेकर, अश्वीन लालन, रवि थोरात, अलिबाग बंजारा समाज कमिटीचे प्रकाश राठोड, लक्ष्मण पवार, किशोर जाधव, राजू जाधव, शिवराम जाधव, शांताबाई जाधव, सिता राठोड आदी मान्यवर व बंजारा समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

यावेळी शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील म्हणाल्या, संत सेवालाल महाराजांनी समाजाला जगण्याचा मार्ग दिला. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन बंजारा समाज आज ताठ मानेने जगत आहे. प्रशांत नाईक यांच्यासारखे अलिबाग नगरीला दातृत्व मिळाले आहे. या समाजाचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी ते कायमच कटीबध्द आहेत. शेतकरी कामगार पक्ष कष्टकरी, शेतकऱ्यांच्या पाठीशी राहिला आहे. त्यांच्या विकासासाठी नेहमीच प्रयत्न केले जात आहेत, असे त्यांनी सांगितले.

अलिबागमध्ये चंपाषष्ठी उत्सव सोहळा



● (छायाचित्र : समीर मालोदे)

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग कोळीवाडा महादेव कोळी समाजाच्यावतीने खंडोबा मंदिरात चंपाषष्ठी उत्सव सोहळा सोमवारी आयोजित करण्यात आला. माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, माजी नगरसेवक अनिल चोपडा यांच्यासह अनेक मान्यवरांनी खंडोबाचे दर्शन घेतले.

यावेळी गुरूवर्य चिंतामणी चिंतामणी भगत, अध्यक्ष सुकूमार भगत, उपाध्य विश्वनाथ पेरेकर, सचिव केतन भगत, खजिनदार वसंत बंद्री, काशीनाथ वरसोलकर, गजानन कुंडी, रवी नाखवा, महेश वरसोलकर, अनिरुध्द भगत, नंदकुमार बंद्री, प्रसाद भगत, मनोहर उंदीरे, व समितीचे इतर सदस्य, कोळी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. चंपाषष्ठीनिमित्त मंदिरात अभिषेक करण्यात आला. त्यानंतर किर्तन घेण्यात आले. दुपारी बारानंतर मंदिरात विधीवत पूजा करून खोबरे -भंडाऱ्याची व फुलांची उधळण केली.

द्रोणागिरी नोड सीआरझेडच्या विळख्यात

। उरण । वार्ताहर ।

सिडकोच्या माध्यमातून द्रोणागिरी नोडची निर्मिती झाली आहे. परंतु, सदर नोड हा समुद्रकिनारी असल्याने त्याठिकाणी सीआरझेड कायदा लागू करण्यात आला असल्याचे अधिकृत सूत्रांकडून समजते. त्यामुळे सीआरझेडबाधित जागेवर बांधकाम करण्यास बंदी असतानाही द्रोणागिरी नोडमध्ये बिल्डर लॉबीकडून इमारती उभ्या करण्याचा सपाटा लावला आहे. परंतु, या बांधकामांवर भविष्यात कारवाईचे संकेत मिळत असल्याने बिल्डरांचे धाबे दणाणले आहेत.

शासनाने समुद्रकिनाऱ्यापासून काही अंतरावर सीआरझेडचा कायदा लागू केला आहे. त्या कायद्यांतर्गत बांधकाम करण्यास परवानगी नसते. मात्र, सिडकोने द्रोणागिरी नोड हे पूर्णपणे समुद्रकिनारी वसविले आहे.

बांधकाम व्यावसायिकांकडून कामांचा सपाटा

त्यामुळे त्या ठिकाणी सीआरझेड कायदा लागू करण्यात आल्याचे अधिकृत सूत्रांकडून समजते. या ठिकाणी ही बांधकाम करण्यास परवानगी नसतानाही बिल्डर लॉबीकडून इमारती उभ्या करून ग्राहकांच्या माथी मारण्याचा प्रयत्न सुरू आहे.

द्रोणागिरी नोडमध्ये बिल्डर लॉबीच्या आमिषाला बळी पडण्याआधी आपण घेत असलेल्या जागेचा सर्व्हे नंबर नक्कीच तोच आहे का? इथपासून ते सर्व कागदपत्रे खरी व नियमाला धरून काम होते की नाही याची पूर्णपणे खातरजमा करूनच आपला मेहनतीचा पैसा खर्ची लावा, असा उरणमधील जाणकारांकडून देण्यात येत आहे.

कार्लेतील शेतकऱ्याची दोन एकरात लागवड

अलिबागचा पांढरा कांदा जानेवारीत बाजारात

। खारेपाट । महेंद्र म्हात्रे ।

अलिबाग तालुक्यातील कार्ले येथील पांढऱ्या कांद्याचे प्रगतशील उत्पादक शेतकरी सतीश म्हात्रे यांनी दोन एकर शेतीत कांद्याची लागवड केली असून, जानेवारी महिन्यात विक्रीसाठी बाजारात दाखल होईल, अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी पांढरा कांदा उत्पादन घेण्यासाठी रेन पाईपद्वारे पाणी देण्याची नवीन अत्याधुनिक पद्धत साकारली असून, ती यशस्वी झाली आहे. गेली अनेक वर्षे अडचणीवर मात करुन पांढऱ्या कांद्याचे उत्पादन होत आहे. सन २०२४ या वर्षी पांढऱ्या कांद्याचे उत्पादन चांगल्या प्रकारे मिळेल, असा विश्वास श्री. म्हात्रे यांनी व्यक्त केला.

अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला केंद्र सरकारकडून भौगोलिक मानांकन मिळाले आहे. पांढऱ्या कांद्याचे विविध औषणी गुणधर्म आहेत. त्यामुळे बाजारातदेखील त्याला मोठी मागणी असते. कार्ले येथील कांदा उत्पादक शेतकरी सतीश म्हात्रे यांनी दि. १४ नोव्हेंबर रोजी कांद्याची लागवड केली आहे. १५ जानेवारीपर्यंत पांढरा कांदा बाजार पेठेत विक्रीसाठी येईल, अशी माहिती श्री. म्हात्रे यांनी दिली. तसेच पांढऱ्या कांद्याच्या लागवडीसाठी व चांगले उत्पादन घेण्यासाठी सन २०२२ पेक्षा २०२३चे हवामान चांगले असून, लागवडीपासून बुरशीनाशक व कीटकनाशकांची फवारणी केल्याचे ते म्हणाले.

कृषी विभाग अलिबाग व जिल्हा कृषी विभागामार्फत अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळत आहे. तसेच निफाड संशोधन केंद्र नाशिक यांच्याकडून योग्य ती माहिती मिळाली, असे सतीश म्हात्रे यांनी सांगितले.

पांढऱ्या कांद्याची लागवड, बेणणी, काढणी, माळा बांधणे तसेच खते, औषधे, मजूर, देखभालकरिता मोठी मेहनत आणि खर्च येतो. नोव्हेंबर ते मार्चपर्यंत कांद्याची लागवड केली जाते. त्यामुळे परिसरातील महिला मजुरांना रोजगाराची संधी निर्माण झाली आहे.

राज्यभरात मोठी मागणी

रायगड जिल्ह्यासह मुंबई, नवी मुंबई, पुणे, कल्याण, डोंबिवी, ठाणे आदी ठिकाणी पांढऱ्या कांद्याला जोरदार मागणी असून, दरवर्षी या ठिकाणी कांद्याचा पुरवठा केला जात आहे.

राजन पांचाळ यांना पुरस्कार जाहीर

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पुरस्काराने होणार गौरव

। अलिबाग । वार्ताहर ।

लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेते राजन पांचाळ यांना आंतरराष्ट्रीय एक्सलन्स अवॉर्ड जाहीर करण्यात आला आहे. दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. हा सोहळा दि.७ जानेवारी २०२४ रोजी पनवेल येथे क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. यावेळी राजन पांचाळ यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

या पुरस्कार वितरण सोहळ्यात पत्रकारिता तसेच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, वैद्यकीय, सांस्कृतिक कला अशा विविध क्षेत्रात अविरतपणे उल्लेखनीय कार्य करणारे आणि सर्व समाजाला प्रेरणादायी असलेल्या व्यक्तींना सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री मंगल प्रभात लोढा, खा. श्रीरंग बारणे, शेकाप नेते जे.एम. म्हात्रे, संपादक विवेक मेहत्रे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

राजन पांचाळ हे सांस्कृतिक आणि नाट्य क्षेत्रात भरीव योगदान देत आहेत. ग्रामीण रंगभूमीची चळवळ सदैव कार्यरत राहण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. त्यांना जाहीर झालेल्या पुरस्काराने माजी आमदार पंडित पाटील, रा.जि.प. माजी सदस्य ॲड. आस्वाद पाटील, भावना पाटील, झेप फाऊंडेशनच्या अध्यक्षा चित्रा पाटील, पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष तथा शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, आदर्श पतसंस्थेचे संचालक सतीश प्रधान, अनंत म्हात्रे, पत्रकार प्रकाश म्हात्रे, अनंत सांस्कृतिक कलामंच पेझारी-अलिबाग संस्थेचे कलाकार, लक्ष्मीनगर मंडळाचे पदाधिकारी, नूतन क्रीडा मंडळाच्या पदाधिकारीआदींनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

संसदेतील दडपशाही

तीन राज्यांतील यशाची धुंदी फारच तीव्र झालेली दिसते. संसदेत ज्या निर्ममपणे विरोधकांचा आवाज दडपण्याचा प्रकार चालू आहे त्यावरून तरी असेच म्हणावे लागेल. संसद घुसखोरी प्रकरणी गृहमंत्री अमित शाह यांनी निवेदन करावे अशी विरोधकांची मागणी होती. ती अजिबात चुकीची नव्हती. लोकसभेमध्ये दोन जण उड्या मारतात व धुराची नळकांडी फोडतात ही गंभीर बाब आहे. सुरक्षा यंत्रणा नीट काम करीत नसल्याचे ते लक्षण आहे. देशभरात घडलेल्या घटनांबाबत आवाज उठवण्यासाठीच तर संसदेचे व्यासपीठ आहे. हा तर संसद चालू असताना खुद्द संसदेत घडलेला प्रकार होता. या मागणीबाबत सामोपचाराने तोडगा काढणे सभापतींना शक्य होते. नव्हे, त्यांच्याकडून तीच अपेक्षा आहे. मात्र सरकार आणि सभापती यांचा अहंकार मोठा झाला आहे. त्यामुळे, गोंधळ केल्याचे निमित्त करून सुमारे ३३ सदस्यांना निलंबित करुन टाकले गेले. भाजप विरोधी पक्ष असताना त्याच्या सदस्यांनी एकेका प्रश्नावरून कित्येक आठवडे कामकाज होऊ दिले नव्हते. दिवंगत अरुण जेटली यांनी तर हा विरोधकांचा हक्कच आहे असे समर्थन तेव्हा केले होते. आता मात्र विरोधकांचा आवाज सरकारला जराही खपत नाही व त्यांना आपण वाटेल तसे दडपू शकतो असे त्याला वाटू लागले आहे. विरोधकांनी राजकारण करू नये असे आवाहन पंतप्रधानांनी दोन दिवसांपूर्वी केले. एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत ते बोलले. मात्र याच विषयावर संसदेत येऊन बोलणे हे त्यांना नको वाटते. त्यात त्यांचा अहंकार दुखावला जातो. यापूर्वी मणिपूरमधील हिंसाचाराबाबतही पंतप्रधानांनी हीच भूमिका घेतली. विरोधकांना अविश्वास ठराव आणावा लागला. तिथेही ठरावाला उत्तर देताना ते आधीचे दोन तास काँग्रेस, नेहरू इत्यादींवरच बोलत राहिले. असल्या डावपेचांबाबत मोदींना स्वतःचे कौतुक वाटत असेल. पण हे सर्व पंतप्रधानपदाला शोभणारे नाही. आतादेखील विरोधकांनी राजकारण करू नये असे म्हणणे म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा होत.

मोदी सरकारचा पोकळपणा

या प्रकरणातील आरोपींचा तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांशी कसा संबंध आहे हे दाखवण्याचा खटाटोप पंतप्रधान ज्या पक्षाचे आहेत त्यानेच सर्वप्रथम केला. त्याचे सोशल मिडिया प्रमुख अमित मालवीय यांनी आरोपी आणि तृणमूलच्या नेत्यांचे फोटो ट्विट केले. सार्वजनिक ठिकाणी कोणीही कोणत्याही नेत्यांसमवेत फोटो काढून घेऊ शकतो हे आता पुरेसे स्पष्ट झाले आहे. खुद्द पंतप्रधानांसोबतही अशा काही वादग्रस्त लोकांचे फोटो असल्याचे दिसून आले आहे. महिला पत्रकारांना बलात्कार करण्याची धमकी देणारे लोक पंतप्रधानांच्या सोशल मिडियातल्या मित्र यादीत असल्याचे पूर्वी दिसले होते. विशेष म्हणजे इतकी टीका होऊनही पंतप्रधानांनी त्यांना आपल्या यादीतून काढले नव्हते. लोकसभेतील घुसखोरीचे प्रकरण सर्वार्थाने भाजपला गैरसोयीचे आहे. घुसखोर हे प्रेक्षक म्हणून आले. प्रेक्षकांना कोण्या खासदाराचे पत्र असल्याखेरीज प्रवेश मिळत नाही. या घुसखोरांना हे पत्र भाजपच्या म्हैसूरच्या सिंबा नावाच्या खासदाराने दिले होते. हल्ला झाल्याच्या दिवसापासून आजतागायत हे मिडियासमोर आलेले नाहीत. भाजपनेही त्यांच्याबाबत मिठाची गुळणी घेतली आहे. हे पत्र समजा काँग्रेस किंवा अन्य कोणाही विरोधी खासदाराने दिले असते तर भाजपने त्यावरून रान उठवले असते. त्या खासदाराला बडतर्फ करण्याची मागणी केली असती आणि त्याची पोलिसांमार्फत पन्नास वेळा चौकशी झाली असती. दुसरे म्हणजे, आतापर्यंत तरी या घुसखोरांचा कोण्या देशविघातक संघटनेशी संबंध असल्याचे आढळलेले नाही. शिवाय, त्यांनी ना काही हिंसाचार केला, ना शस्त्रे बाळगली, ना कोणती पत्रके वाटली. सर्वात महत्वाचे म्हणजे यामध्ये एकही मुस्लिम वगैरे नाही. अन्यथा या घटनेचा पाकिस्तानशी संबंध जोडून सर्वांना देशद्रोही ठरवणे सोपे झाले असते. या प्रकरणामुळे संसद सुरक्षेतील ढिलाई उघड झाली. विश्वगुरु होण्याच्या बाता करणाऱ्या आणि सतत देशप्रेम, सुरक्षा यावर बोलणाऱ्या भाजप सरकारचा पोकळपणा यातून उघड झाला.

विरोधकांवर खापर

संसदेत निवेदन करायचे तर या सर्वांची कबुली द्यावी लागेल. ते करणे भाजपला शक्य नाही. त्यामुळे विरोधकांवरच याचे खापर फोडून बाहेर निसटण्याची संधी तो पाहत आहे. आधी या घुसखोरांचे संबंध विरोधकांशी आहेत असे भासवण्याचा अयशस्वी प्रयत्न करून झाला. आता या प्रश्नावर विरोधक राजकारण करीत असल्याची बतावणी चालू आहे. दुर्दैवाने संसदेतील या दडपशाहीची झळ सामान्य जनतेला थेटपणे जाणवणारी नसते. त्यामुळे ती या प्रकारापासून अलिप्त राहते. मात्र मोदी सरकार विरोधी आवाज दडपण्याचे नवेनवे प्रकार करीत चालला आहे हे जनतेने समजून घेण्याची गरज आहे. अंतिमतः त्याचा फटका सामान्यांनाच बसणार आहे. चीनने लडाख सीमेवर हल्ला करुन आपला काही भूप्रदेश घेतला आहे असे जाणकार सांगतात. मात्र या प्रश्नावर खासदारांना एकही प्रश्न उपस्थित करायला दिला जात नाही. सरकारने याबाबत कोणतेही निवेदन केलेले नाही. मध्यंतरी, परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी चीन इतका मोठा आहे की भारत त्याच्याशी युध्द करू शकत नाही असे थेट विधान एका मुलाखतीत केले होते. काँग्रेसच्या काळात असे विधान कोणी केले असते तर गदारोळ झाला असता. आता मात्र पूर्ण शांतता आहे. अलिकडे एनआयएने महाराष्ट्रात कारवाई करून घातपाताचा मोठा कट उधळल्याचे जाहीर केले. पडघा भिवंडीमध्ये आयसिसचे केंद्र स्थापन करण्यात आले होते असा दावा करून साकिब नाचन व इतरांना उचलण्यात आले. साकिब नाचनचे नाव पूर्वीही अनेक गुन्ह्यांमध्ये आले आहे. तो इतक्या कारवाया करीत असताना महाराष्ट्र पोलिस काय करीत होते हा महत्वाचा प्रश्न आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याचे उत्तर द्यायला हवे. पण दुर्दैवाने राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा करीत ही सर्व माहिती दडपली जाते. लोकसभेतील घुसखोरांचा संबंध नक्षलवाद्यांशी जोडण्याची भाजप सरकारची खटपट चालू आहे. ते केले की, डाव्या पुरोगाम्यांना बदनाम करता येईल संसदेतील सुरक्षा त्रुटीवर पांघरूण घालता येईल, असा हा सगळा डाव आहे.

विचार

हवाई भरारी, आव्हानेही भारी...

देशात मध्यम तसेच उच्चवर्गीयांची आर्थिक परिस्थिती सुधारल्यामुळे विमानप्रवास करणाऱ्यांच्या संख्येत सतत भर पडत आहे. येत्या चार वर्षांमध्ये नागरी हवाई वाहतूक सेवेमार्फत भारतात ४० कोटी लोक प्रवास करतील, अशी अपेक्षा आहे. रेल्वे आणि रस्ते वाहतुकीसोबतच नागरी विमान वाहतूकही भारतातील दळणवळणाचा मोठा आधार बनणार आहे. हे होत असताना या क्षेत्राला कोणत्या बदलांना, आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे?

हेमंत देसाई

दरवर्षीप्रमाणे यंदादेखील सात डिसेंबर रोजी जगभरात 'आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक दिन' साजरा झाला. जगभरातील विमानतळांवरील कर्मचारी व्यवस्थापन आणि हवाई वाहतूक नियंत्रणासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो. अखिल विश्वातील नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात नागरी उड्डाणाचे महत्त्व काय आहे, याची जाणीव करून देण्यासाठी हा दिवस पाळला जातो. भारतात शहरीकरण वाढले असून मध्यम तसेच उच्चवर्गीयांची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. त्यामुळे देशातील देशात विमानाने प्रवास करणाऱ्यांच्या संख्येत सतत भर पडत आहे. तीन महिन्यांपूर्वी मुंबई ते अहमदाबाद या 'आकासा एअर'च्या पहिल्या विमानसेवेचे उद्घाटन झाले. पूर्वी विमानाने प्रवास करणे केवळ उच्चभ्रू लोकांना शक्य होते. आता पूर्वीच्या तुलनेत परवडणाऱ्या दरात हवाई प्रवास करणे शक्य होऊ लागले आहे. 'उडान' योजनेअंतर्गत ४२५ हवाई मार्ग आहेत. ते लवकरच एक हजारपर्यंत जातील. भारतात ६८ नवे विमानतळ उभारण्यात आले असून लवकरच त्यांची संख्या शंभरवर नेण्यात येणार आहे. येत्या चार वर्षांमध्ये नागरी हवाई वाहतूक सेवेमार्फत भारतात ४० कोटी लोक प्रवास करतील, अशी अपेक्षा आहे. रेल्वे वाहतूक आणि रस्ते वाहतुकीसोबतच नागरी विमान वाहतूकही भारतातील वाहतुकीचा मोठा आधार बनणार आहे.

गेल्या महिन्यात केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी गोव्यातील नागरी हवाई वाहतूक सेवा संस्थेमार्फत आयोजित करण्यात आलेल्या आशिया पॅसिफिक परिषदेला संबोधित केले. त्यावेळी बोलताना ते म्हणाले की, भारतीय नागरी हवाई वाहतूक क्षेत्र आगामी सात ते दहा वर्षांमध्ये प्रचंड गतीने वाढणार आहे. भारतीय हवाई वाहतूक उद्योग कोविडपूर्व प्रवासी वाहतुकीच्या जवळपास ९५ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे, अशी माहिती केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री विजयकुमार सिंग यांनी दिली. गोव्यातील नवीन ग्रीनफिल्ड विमानतळ लवकरच कार्यान्वित होणार असून त्यामुळे गोव्यात पर्यटनाच्या अधिक संधी उपलब्ध होतील, अशी माहिती गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी यावेळी दिली.

भारतीय लोक मोठ्या प्रमाणात जग पर्यटनाला बाहेर जातात. बड्या बड्या ट्रॅव्हल कंपन्यांच्या जाहिराती आणि त्यांना मिळणारा प्रतिसाद पाहिला, तरी याची सहज कल्पना येते. हिवाळ्यात भारतात पर्यटनाला येणाऱ्या प्रवाशांची संख्या लक्षणीय प्रमाणात वाढते. या पार्श्वभूमीवर चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहीमध्ये भारताची आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक प्रवासी संख्येच्या दृष्टीने कोविडपूर्व अवस्थेत पोहोचणे, ही आनंदवार्ताच मानायला हवी. एप्रिल ते डिसेंबर २०२३ या सहामाहीमध्ये भारतात हवाईमार्गे येणारे आंतरराष्ट्रीय प्रवासी आणि भारतातून बाहेर देशांमध्ये जाणारे प्रवासी यांची संख्या तीन कोटी १४ लाख इतकी झाली. मागच्या वर्षात हा आकडा तीन कोटी १३ लाख इतका होता. आंतरराष्ट्रीय प्रवासात २०२२ पासूनच सुदृढ वाढ होऊ लागली होती. २०२२-२३ मध्ये भारतात येणाऱ्या आणि भारतातून बाहेर जाणाऱ्या प्रवाशांची संख्या जवळपास अडीच कोटींपर्यंत पोहोचली होती. मात्र २०२० मधील आकडेवारीच्या तुलनेत ही आकडेवारी २१ टक्क्यांनी कमीच होती. भारतात येजा करणारे प्रवासी मुख्यतः परदेशी विमान कंपन्यांच्या विमानातून प्रवास करतात. परंतु तरीही गेल्या चार वर्षांमध्ये देशी विमान कंपन्यांच्या बाजारहिस्स्यामध्ये नऊ टक्क्यांची वाढ झाली आहे. याचा अर्थ त्यांची कामगिरी किरकोळ मानता येणार नाही. अगोदर भारतीय विमान कंपन्यांचा बाजार हिस्सा ३५ टक्के होता. तो आता ४४ टक्के झाला आहे. चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहीत एकूण तीन कोटी १४ लाख प्रवाशांनी परदेशी प्रवास केला. त्यापैकी एक कोटी ३९ लाख व्यक्तींनी भारतीय हवाई कंपन्यांमार्फत प्रवास केला.

इंडिगो आणि विस्तारा या खासगी कंपन्यांचा दबदबा अलिकडच्या काळात वाढला आहे. एअर इंडिया ही पूर्वी सरकारी कंपनी होती. आता ती टाटा समूहाचा एक भाग बनली आहे. तिनेही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. उलट 'स्पाईसजेट'सारखी कंपनी अडचणीत असून तिचा बाजारहिस्सा घटला आहे. वाडिया समूहाच्या मालकीच्या 'गो फर्स्ट' या कंपनीचा व्यवसाय कमी झाला आहे. मे महिन्यापासून तर तिने आपला व्यवसाय स्थगित केला आहे. 'एअर इंडिया एक्सप्रेस' या एअर इंडियाच्या कंपनीतला बाजारपेठेतील वाटा घटला आहे. इंडिगो, विस्तारा आणि एअर इंडियाने आपले नेटवर्क विस्तारले असून क्षमतादेखील वाढवली आहे. काही विदेशी कंपन्यांच्या वाहतूक क्षमतेतही थोडी-बहुत वाढ झाली आहे. तसेच रशिया-युक्रेन युद्धामुळे काही नॉर्थ अमेरिकन कंपन्यांनी आपल्या विमानांच्या उड्डाणांमध्ये घट केली आहे. त्याचा फायदा भारतासारख्या देशांना होत आहे इंडिगोचा बाजारपेठेतील वाटा एक वर्षापूर्वी १५.७ टक्के होता. तो आता १७.८ टक्के झाला आहे. चार वर्षांपूर्वी तर तो फक्त दहा टक्के इतका होता. विस्ताराचा बाजारहिस्सा ०.१ टक्के होता. तो आता ३.२ टक्के इतका झाला आहे. एअर इंडियाचा वाटा १२.२ टक्क्यांवरून १२.६ टक्के इतका झाला आहे. एअर इंडिया एक्सप्रेस, एअर इंडिया आणि विस्तारा या तिन्ही कंपन्या टाटा समूहातील असून देशातले २३ टक्के प्रवासी या कंपन्यांच्या विमानांमधून प्रवास करतात. 'स्पाइसजेट'चा बाजारपेठेतील वाटा ३.६ टक्क्यांवरून २.६ टक्क्यांवर आला आहे. कार्यक्षमता, विश्वासार्हता, सुविधा, त्यांची गुणवत्ता अशा घटकांवर कोणतीही हवाई वाहतूक कंपनी लोकप्रिय ठरते.

भारतीय हवाई वाहतुकीतील भागधारक २०२७ पर्यंत आपल्या ताफ्याचा आकार ११०० विमानांपर्यंत वाढवतील, असा अंदाज आहे. विमान वाहतूक क्षेत्रातील सततच्या दुहेरी अंकी वाढीमुळे भारतात देखभाल, दुरुस्ती सेवा सुविधांची मागणी वाढत आहे. पूर्वोत्तर राज्यांमध्ये विमान वाहतूक उद्योगाच्या विकासासाठी गुवाहाटीला आंतर-प्रादेशिक केंद्र म्हणून विकसित करण्याची योजना आखली जात आहे. भारतीय विमानतळ मंत्रालयात वाढ करण्यासाठी स्पेशल इकॉनॉमिक झोन (सेझ) एरोट्रोपोलिस मॉडेलचे अनुकरण करत आहेत. हे मॉडेल किरकोळ विक्री, जाहिरात, वाहन पार्किंग, सुरक्षा उपकरणे आणि सेवांमधून उत्पन्न मिळवण्यावर लक्ष केंद्रित करते. दिल्ली, हैदराबाद आणि बंगळुरु येथील तीन सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीई) मॉडेल विमानतळांनी २०२५ पर्यंत तीस हजार कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांवर काम सुरू केले आहे. केंद्र सरकार २०३० पर्यंत भारताला हवाई वाहतूक क्षेत्रातील आघाडीच्या देशांपैकी एक बनवण्याचे स्वप्न पहात आहे. उत्तर प्रदेशमध्ये जेवार येथे ग्रीनफील्ड विमानतळ उभारले जात आहे. तिथे रोजगाराच्या संधी वाढतील आणि विमान उत्पादन आणि निर्यातीला प्रोत्साहन देण्याचे धोरण आखले जाईल. त्यासाठी 'उडान' उपक्रमांतर्गत सुरू असलेले प्रकल्प कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याची गरज आहे. याव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय उडान उपक्रमांतर्गत आंतरराष्ट्रीय विमानतळांची विद्यमान क्षमता वाढवणे गरजेचे आहे. विमान देखभाल, दुरुस्ती आणि ओव्हरहॉल सेवांसाठी भारताला जागतिक केंद्र बनवण्याच्या सरकारच्या उद्देशामुळे खर्चात बचत होईल आणि विमान कंपन्यांसाठी तरलता निर्माण होईल.

याव्यतिरिक्त, नागरी एमआरओ आणि संरक्षण क्षेत्र यांच्यातील अभिसरण मोठ्या प्रमाणात आणि दीर्घकालीन फायद्यांची अर्थव्यवस्था निर्माण करू शकते. विमानचालन तंत्रज्ञानातील प्रगत संशोधनासाठी दीर्घकालीन योजना तयार केल्याने देशात उत्पादन परिसंस्था निर्माण करण्यात मदत होईल. एविएशन उद्योगातील नवीनतम तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन पद्धती आत्मसात करण्यासाठी मूळ उपकरणे उत्पादक (ओईएम), उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्यात सहकार्य आणि सहकार्याला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. वित्त वाढ एविएशन टर्बाईन फ्युएलची कर आकारणी आणि किंमत संरचना जीएसटीच्या कक्षेत आणण्यासाठी आणि जागतिक मापदंडाशी सुसंगत करण्याचा विचार केला पाहिजे. सर्व प्रमुख केंद्रांमधील विमानतळ प्राधिकरण विमानतळांजवळील रिकाम्या जागांवर कमाई केली जाऊ शकते. या प्रदेशात स्वतःला 'ट्रान्सशिपमेंट हब' म्हणून स्थापित करून भारत अनेक फायदे मिळवू शकते. ते सेवा प्रदाता म्हणून भारताची व्यापार क्षमता वाढवेल, परकीय चलन कमावणारा देश म्हणून उदयास येईल आणि या प्रदेशात उत्तम कनेक्टिव्हिटी सक्षम करेल.

आजकाल

शेतकरी सर्व बाजूने लुटला जात आहे

सोमिनाथ घोळवे

एकीकडे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सातत्य राहावे म्हणून सरकार ''शेतकरी सन्मान निधी'' योजनेतून वर्षाला ६ हजार देते. तर दुसरीकडे कांदाबंदी सारखे निर्णय घेऊन (धोरण स्वीकारून) अप्रत्यक्षात शेतकऱ्यांची कितीतरी पटीने लूट करून मध्यम वर्ग-ग्राहकांमध्ये गुंतवणूक केली जाते. उदा. एक एकरमध्ये जेथे शेतकऱ्यांच्या कांदा उत्पन्न १ लाखाचे होणार होते, ते २० ते ३० हजार रुपये होईल की नाही सांगता येत नाही असे मते अनेक शेतकऱ्यांची आहेत. या उत्पन्नात किमान ४० ते ४५ हजार रुपये शेतकऱ्यांची गुंतवणूक आहे. त्यामुळे निर्यात बंदी ही वरवरची आहे, असे बाहेरून दिसत असले तरीही आतून कपडे, अन्न, शिक्षण, आरोग्य, मुलाबाळांची लग्न, आयुष्य अशा विविध बाजूने शेतकरी लुटला जात आहे. अशी लूट शेतकऱ्यांच्या जीवनात होणे हा खूप मोठा आघात आहे. या आघातून कसे सावरायचे हे आतातरी सांगणे कठीण आहे. (असेच इतरही नगदी पिकांचे चालू आहे. सोयाबीन घ्या, किंवा तूर घ्या).

कांदा निर्यात बंदीमुळे कांदा उत्पादक शेतकरी केवळ कर्जबाजारी झाला नाहीतर दिवाळखोरीत निघायला लागला आहे. कारण उत्पादन खर्च देखील निघत नाही. तर उत्पन्न वाढीच्या आशेची राख झाली आहे. २०२३ पर्यंत दुप्पट उत्पन्न सोडून द्या. आहे ते उत्पन्न टिकवणे शक्य राहिले नाही. उदा. ४५०० ते ५००० हजार रुपये प्रती क्विंटल असलेला कांदा ५०० ते १५०० रुपये क्विंटल भावाने विकला जात आहे. असे असेल तर कसले उत्पन्न वाढ. उत्पन्न घटले असेल तर मुलांचे शिक्षण, मुलींची लग्न, कुटुंबाचे आरोग्य, बाजार हाट, मूलभूत गरजा (अन्न, वस्त्र, आरोग्य) इत्यादी पूर्ण कशा करायच्या. घेतलेले खासगी सावकाराचे कर्ज कसे फेडायचे. बँकांची, सोसायटी, मायक्रो फायनान्स असे संस्थांचे काय?. अतिशय गंभीर प्रश्न कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या समोर उभा केला आहे.

एकवेळ नैसर्गिक आपत्तीमुळे (गारपीट, अतिवृष्टी, दुष्काळ, रोगराई) पिकांच्या झालेले नुकसानीस सरकारने आर्थिक मदत/अनुदान दिले नाही तरी चालेल. (असेही ही मदत इतकी अत्यल्प असते की एकूण गुंतवणूकीच्या २० ते २५ टक्के देखील नसते.अनेकदा नुकसानीचे मूल्यमापन देखील होत नाही.) पण सरकारने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास (कांदा) निर्यात बंदी सारखे निर्णय घेऊन काढून घेऊ नये. कांदा निर्यात बंदी म्हणजे शेतकऱ्यांवर सरकारने ओढवलेली प्रकारची सरकारी आपत्ती आहे. जी नैसर्गिक आपत्तीपेक्षा भयंकर वाटावी अशी आहे. ज्या सरकारला मायबाप सरकार म्हटले जाते, तेच सरकार अशाप्रकारे कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर निर्णयारूपी आपत्ती आणत असेल तर न्याय कोणाकडे मागायचा?

व्हायरल

आमच्या सोसायटीतील बेचाळीस बेंच

पंच्याऐंशी साली रघुनाथकाका गेले, तेव्हा त्यांच्या मुलांनी सोसायटी कंपाऊंडच्या कोपऱ्यात काकांच्या स्मरणार्थ दोन बेंच बांधून घेतले. छान ग्रॅनाईटचे बेंच. काटकोनात बांधलेले. एका बेंचवर तीनजण बसू शकतील असे. काकांच्या स्मरणार्थ अशी पाटी कोरलेले. खरेदी करून किंवा देवळातून आल्यावर जिने चढायच्या आधी वयस्कर लोक जरा बेंचवर बसून दम खात. क्रिकेट खेळून अगदीच घाम आल्यावर, किंवा बॉल शेजारच्या वाडीत गेला तर तो परत आणेपर्यंत, मुलं बेंचवर बसून गप्पा मारत.

ब्याण्णव साली कुलकर्णी आजोबा गेले तेव्हा त्यांच्या मुलीनेही बेंच बांधून घेतला. बेंचच्या काटकोनाची एक बाजू डबल लांबीची झाली. दोनतीन वर्षांनंतर तिनं फ्लॅट विकला. बेंच ऑफ कोर्स तसाच राहिला. स्वातंत्र्यापूर्वीचं जग पाहिलेली पिढी हळूहळू काळाच्या पडद्याआड जाऊ लागली. सोसायटीतल्या बेंचची संख्या हळूहळू वाढत राहिली. सोसायटीसमोरच्या पूर्व आणि दक्षिण भिंतीची परिमिती बेंचने भरून गेली. दोन हजार सालची ईजीएम मला क्लीअरली आठवतेय. सोसायटीच्या सुरूवातीपासून राहणारे मेहता अंकल गेले, आणि त्यांच्या मिसेसने त्यांच्या स्मरणार्थ तीन बेंच लावायचे आहेत असं मॅनेजिंग कमिटीला कळवलं. सेक्रेटरी तसे नवीन होते, आणि त्यांनी ईजीएम बोलावली.

''आपल्या सोसायटीत आता दहा बेंच आहेत. एन्ट्री केल्यावर डावीकडच्या दोन्ही भिंतींच्या कडेला बेंच आहेत. उजवीकडची जागा वाहनांना मागे पार्किंगमध्ये जायला रिकामी ठेवली पाहिजे. त्यामुळे अजून बेंच लावणं कठीण आहे.'' सेक्रेटरींनी मीटिंगमध्ये सांगितलं.

मेहता अंकलचा मुलगा चेतन चवताळून उठला. ''दहादहा बेंच आहेत बिल्डिंगमंदी, एकाएका माणसाचे दोन-दोन बेंचपण आहेत. पण माझ्या पप्पांचा बेंच बांधायचा नाही? हा अन्याय आहे.''

''तसं नाही हो, पण जागा कुठेय?'' सेक्रेटरी त्याला शांत करायचा प्रयत्न करत म्हणाले.

''पप्पांचा एकतरी बेंच पायजेच. कुलकर्णींचा बेंच आता कशाला? त्यांचा फ्लॅटपण नाय आता. तो तोडा आणि आमचा बेंच बसवा. समदा खर्च मी करतो.'' चेतनने त्याच्या परीने सोल्यूशन दिलं, पण त्यानं आगीत तेल ओतल्याचा परिणाम झाला. ''मामांच्या बेंचला हात लावायचा नाही, समजलात?'' सोसायटीत राहणारा कुलकर्ण्यांचा भाचा कडाडला. ''अहो रागावू नका. त्यांचा पॉईंट ऐकून तरी घ्या.''

''मामांचा फ्लॅट विकला म्हणताय तर रघुनाथकाकांचाही विकलाय. त्यांचे बेंचपण तोडायचे?'' सगळे निरुत्तर झाले. सोसायटीची स्थापनाच मुळात रघुनाथकाकांच्या पुढाकाराने झाली होती. जुन्या चाळीतले दिवस आठवणारे आणि त्यामुळे रघुनाथकाकांबद्दल कृतज्ञ असणारे लोक अजून सोसायटीत होते. शिंदे आजींनी घसा खाकरला. ''मी काय म्हणते, कोपऱ्यात काटकोनात बेंच आहेतच. जरा गॅप ठेवून अजून बेंच बांधला तर बेंचचा छान चौकोन होईल. आठदहा जणांना गप्पा मारायलाही बरं.'' सेक्रेटरींनी सुटकेचा निश्वास सोडला. शिंदे आजींच्या सुचनेनुसार ठराव पास झाला. चेतनने दोन बेंच बसवले, आणि बेंचच्या चौकोनाच्या आत मार्बलचं छोटं टेबलही बसवलं.

चार साली डिसूझा आंटी गेल्या तेव्हा हा प्रिसिडंस होताच. रोझमेरीनं पुढच्या बेंचच्या काटकोनात एक बेंच बसवला आणि बेंचचं आखात निर्माण झालं. पुढच्या वर्षी सुब्रमण्यम अंकल गेले आणि आखाताचं रूपांतर चौकोनात झालं. मग हे चालूच राहिलं.मुलांची खेळायची जागा जाते म्हणून कोणीतरी एकदा माफक विरोधाचा प्रयत्न केला होता; पण मुलं आता खेळतात तरी कुठे, असं सांगून त्यांना गप्प बसवण्यात आलं. बिल्डिंगमध्ये लिफ्ट आली. खरेदी करून किंवा देवळातून दमून आलेले लोक लिफ्टने डायरेक्ट घरी जाऊन एसीची हवा खाऊ लागले. मुळात खरेदी झेप्टोवर आणि देवदर्शन अशाच कुठल्या ॲपवर सुरू झाल्यानं लोकांचं दमून घरी परतणंही कमी झालं.आमच्या सोसायटीत आलात तर मॉलमधल्या फूडकोर्टच्या टेबलांसारखे बेंचचे चौकोनच्या चौकोन दिसतील. एकूण बेचाळीस बेंच झालेत, पण क्वचितच कोणी तिथे बसतं. नावं आणि मृत्यूतिथी यांच्या पाट्यांमुळे सोसायटीचं अंगण ख्रिश्चनांच्या स्मशानभूमीसारखं भासतं.

- देवदत्त वांबळे

लोकसंसद

कारवाईचा निर्णय योग्यच, दंडाची रक्कम वाढवा

कबुतरांना दाणे, धान्य टाकणाऱ्यांवर मुंबई महापालिका आता कारवाई करणार असून दाणे टाकताना एखादी व्यक्ती आढळल्यास त्या व्यक्तीला १०० ते ५०० रुपयांपर्यंत दंड आकारणार आहे. मुंबईकरांच्या आरोग्यासाठी पालिका प्रशासनाने घेतलेला निर्णय योग्यच आहे. कारण मुंबईत ठिकठिकाणी असलेल्या कबुतरखान्यातच नव्हे तर शहरात सगळीकडेच कबुतरांचा प्रचंड सुळसुळाट झाला असून त्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कबुतरांना दाणे खायला दिल्याने पूर्वजांच्या आत्म्याला शांती मिळते अशी काही लोकांची धारणा असल्यामुळे त्यांना दाणे खायला देण्याचे 'पुण्यकर्म' त्यांच्याकडून राजरोसपणे चालूच आहे. केवळ कबुतरखानेच नव्हे तर मुंबईच्या अनेक गल्लीबोळात असलेले किराणा दुकानदार सकाळी आपल्या दुकानासमोर कबुतरांसाठी दाणे टाकतात आणि ते टिपण्यासाठी कबुतरांचे थवे त्या ठिकाणी गोळा होतात. कबुतरांच्या विष्ठेतून निघणारा ॲस्परजेलिस हा घटक मानवी आरोग्यास अत्यंत हानिकारक आहे. त्यामुळे न्युमोनिया, अस्थमा, फंगल इन्फेक्शन, त्वचेची ॲलर्जी असे अनेक रोग वाढीस लागतात. पालिका प्रशासनाला कबुतरांना दाणे खिलवणाऱ्या लोकांवर खरोखरच कारवाई करायची असेल तर सर्वात आधी कबुतरखान्याजवळ दाण्यांची पोती घेऊन दाणे विक्री करणाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे आणि दंडाची तुटपुंजी रक्कम ५००० रुपयांपर्यंत वाढवली पाहिजे.

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

प्रेरणा

मी आहे

एका झेन गुरूच्या प्रवचनानंतर एक माणूस त्यांच्यापाशी आला आणि भाविकतेने लीन होऊन म्हणाला, गुरुदेव, तुमच्यात साक्षात दैवी शक्तीचा वास आहे.

गुरू म्हणाले, तुमचं बरोबर आहे.

थोड्या वेळाने दुसरा माणूस आला आणि क्रोधाने म्हणाला, तुमची शिकवण सैतानी स्वरूपाची आहे.

गुरू म्हणाले, तुमचं बरोबर आहे.

हा संवाद ऐकणाऱ्या शिष्याने गुरूला विचारलं, गुरुदेव, हे दोघेही बरोबर कसे असू शकतात?

गुरू म्हणाले, हे दोघेच नाही, तर माझ्याबद्दल हजार माणसांची हजार मतं असतील, तर ते हजारही जण आपापल्या जागी बरोबरच आहेत. त्यांना मी कळतो का? ते फक्त माझ्याविषयी त्यांची काय समजूत झाली ती सांगत असतात. त्यांची समजूत म्हणजे मी नाही.

शिष्य म्हणाला, पण मग तुम्ही यापैकी नेमके कोण आहात?

गुरू म्हणाले, मी यापैकी काहीही असण्याची गरजच काय? मी मी आहे. तेवढंच माझ्यासाठी पुष्कळ आहे. मला माझ्याविषयी कोणतीही समजूत करून घेण्याचं काहीच प्रयोजन नाही.

ओशो

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१९ डिसेंबर

१) श्रीम. अलका अशोक पाटील
नागडोंगरी, अलिबाग, १९-१२-१९५३
२) श्रीम. विठाबाई लक्ष्मण बना
अलिबाग, १९-१२-१९५२
३) श्रीम. शिला भालचंद्र रोकडे
अलिबाग, १९-१२-१९४१

प्रदूषणाविरोधात चिमुकले रस्त्यावर

आंदोलनात नागरिक मोठ्या संख्येने सहभागी; पुढच्या पिढीला वाचवण्यासाठी लढा

। पनवेल । वार्ताहर ।
तळोजा एमआयडीसीतून हवेत सोडल्या जाणाऱ्या घातक वायूंमुळे तळोजा परिसरातील नदी, नाले प्रदूषित झाले आहेत. रात्रीच्या वेळी प्रदूषणाचा स्तर वाढत असल्याने रहिवाशांना घराची दारे-खिडक्या बंद करून राहण्याची वेळ आली आहे. त्यामुळे रेसिडेंट वेल्फेअर असोसिएशनने मोर्चा काढून प्रशासनाचा निषेध केला. यावेळी आंदोलनात रोडपाली, कळंबोली आणि खारघरमधील रहिवाशांबरोबर चिमुकल्यांची संख्या लक्षणीय होती.

फलकांमधून वेधले लक्ष

तळोजा एमआयडीसीमधून रात्रीच्या वेळी हवेत होत असलेल्या प्रदूषणाविरोधात सहभागी नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. या मोर्चात रोडपाली येथील सोसायट्यांमधील दीडशेहून अधिक नागरिक सहभागी झाले होते. यावेळी आम्हाला शुद्ध हवेत खेळायचे आहे, प्रदूषित नही शुद्ध हवा चाहिये, वातावरण को प्रदूषित करनेवाले को जनता माफ नहीं करेगी, जन जन का एकही सपना, प्रदूषण मुक्त हो शहर अपना, अशा फलकांमधून लक्ष वेधून घेत होते.

तळोजा औद्योगिक वसाहतीमधून रात्रीच्या वेळी सोडणाऱ्या येणाऱ्या वायूंमुळे तळोजा, खारघर, कळंबोली परिसरात मोठ्या मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. पहाटे तसेच रात्रीच्या वेळी प्रदूषणाचा सर्वाधिक त्रास होत आहे. वायू प्रदूषणाविरोधात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडे वारंवार तक्रार करून देखील प्रशासन याबाबत कोणतीही ठोस पावले उचलत नाही. त्यामुळे लाखो रुपयांचे कर्ज घेऊन खारघरमध्ये घरे खरेदी करणाऱ्यांना दूषित हवेच्या वातावरणात वास्तव्य करावे लागत आहे. पण या विषयावर सिडको एकही शब्द काढत नाही. त्यामुळे एमआयडीसी आणि महाराष्ट्र प्रदूषण मंडळाविरोधात सर्वांना एकत्र करून पुढच्या पिढीला वाचवण्यासाठी प्रदूषणाच्या विरोधात लढा देण्याचा संकल्प अध्यक्ष गिरीश जोशी आणि सामाजिक कार्यकर्ते दीपक सिंग यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या मोर्चात करण्यात आला. यावेळी मोर्चात लहान मुलांसह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी लहान मुलांच्या हातातील फलक सर्वांचे

लहान मुलांचे भवितव्य धोक्यात

जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार १५ वर्षांपेक्षा कमी वयाची मुले मोठ्या प्रमाणात प्रदूषणाच्या विळख्यात दिवसागणिक अडकत चालली आहे. येणाऱ्या पिढीचे भविष्य सुद्धा यामुळे धोक्यात आले आहे. तसेच गर्भवती महिलांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने प्रदूषणाविरोधात खारघर, कळंबोली, तळोजा, कामोठे, रोडपालीतील नागरिकांनी एकत्र येण्याची गरज व्यक्त केली गेली.

जी. एम. वेदक महाविद्यालयाची कोळंबी प्रकल्पास भेट

। तळा । वार्ताहर ।
जी. एम. वेदक महाविद्यालयातील प्राणीशास्त्री विभागातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्गातील विद्यार्थी यांची मांदाड एक्वा फिशरीज सोसायटी आणि रिद्धी सिद्धी एक्वा कल्चर मांदाड येथे कोळंबी प्रकल्पास नुकतीच शैक्षणिक सहल आयोजित केली होती. ही शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांच्या पाठ्यक्रमाचा एक भाग आहे. या प्रकल्पाचे मालक श्री. बाणकोटकर व त्यांचे सहयोगी शशांक वेदक व सौ.वेदक यांनी तेथील सर्व प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. या प्रकल्पाचे तांत्रिक सहाय्यक श्री नायर व श्री विनोद यांनी सर्व विद्यार्थ्यांना कोळंबी प्रकल्पाच्या तांत्रिक बाबी व घ्यावयाची काळजी यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या सर्व शंकांचे निराकरण केले. त्यांनी कोळंबी हाताळण्याचे प्रात्यक्षिक सुद्धा दाखविले. या कार्यक्रमास महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य पुरुषोत्तम मुळे उपस्थित होते. सदरील शैक्षणिक सहलीमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी व चार कर्मचारी यांचा सहभाग होता. शैक्षणिक सहलीमध्ये महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. मिर्झा, डॉ. भवरे, डॉ. जामदार व विशाल खराडे यांचे सहकार्य लाभले.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

कै. केसरीनाथ मंगळ्या कोळी, स्मरणार्थ, अलिबाग

गुटखा-तंबाखू जप्त

पनवेल : महाराष्ट्रात गुटखा, पान मसाला, जर्दा, तंबाखू आदी अन्न पदार्थांची विक्री करण्यास बंदी असतानाही शेडुंग फाटा, आजिवली गाव, कोन गाव आदी ठिकाणी प्रतिबंधित अन्न पदार्थ विर्कीस ठेवल्या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन पेणच्या पथकाने कारवाई करत सदर ठिकाणाहून मुद्देमाल हस्तगत केला आहे. आजिवली येथील मोहम्मद हॉटेल येथील पान टपरी, पवनकुमार यादव पान शॉप, कोन येथील शिवकृपा पान शॉप, दिशा पान शॉप यांच्या पान टपऱ्यांवर विषेश पथकाने धडक कारवाई करून त्यांच्या कडून एकूण ६४४ पाऊच हातगत करण्यात आले. त्यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद केली आहे.

माणगाव येथील टीएमसी कॉलेजमध्ये कायदेविषयक शिबीर

। माणगांव । वार्ताहर ।
माणगांव येथील जे. बी. सावंत एज्यूकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये शनिवार दि. १६ डिसेंबर रोजी माणगाव तालुका विधी सेवा समिती वकील संघ माणगांव व महिला विकास कक्ष टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक कार्यशाळा घेण्यात आली.

सदर शिबिराचे अध्यक्षस्थान जिल्हा न्यायाधिश एच. के. भालेराव यांनी भुषविले. या शिबिराला दिवाणी न्यायाधीश एम. ए. पठाण, सह. दिवाणी न्यायाधिश जी. सी. फुळझळके आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात सह. दिवाणी न्यायाधीश माणगांव ए. एस. साटोरे यांनी मानसिकदृष्ट्या अपंग व्यक्तीच्या कायद्याविषयी मार्गदर्शन, सह. दिवाणी न्यायाधीश एम. एस. पठारे यांनी २०१६ च्या दिव्यांग कायद्यांतर्गत असलेले हक्क, सहायक सरकारी अभियोक्ता ॲड. योगेश तेंडूलकर यांनी अल्पवयीन मुलींवरील अत्याचार यासंबंधी असणाऱ्या पोक्सो कायद्याची पोक्सो कायदयाअंतर्गत येणाऱ्या तरतूदी व शिक्षा याबद्दल माहिती दिली.

माणगाव टीएमसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. विनोद घायाळ यांनी केले तर प्रा. हर्षल जोशी यांनी सूत्रसंचालन केले. या शिबिराला ७० विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी तालुका विधी सेवा समिती व वकील संघ माणगांव यांनी विशेष परिश्रम घेतले.

सात दिवसीय शिबिराचा समारोप

। कोर्लई । वार्ताहर ।
मुरुडच्या अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड-जंजिरा महाविद्यालयातील राष्ट्रीयसेवा योजना विभागातर्फे मजगांव येथे सात दिवसीय विशेष निवासी शिबीर संपन्न झाले.

या शिबिराचे उद्घाटन दि.१० डिसेंबर रोजी झाले होते. सदर शिबिरात ग्रामस्वच्छता अभियान, प्लास्टिकचे संकलन, जिल्हा परिषद शाळा मजगाव येथील शाळेचा परिसर स्वच्छ करणे, शासनाच्या वेगवेगळ्या योजनांची माहिती लोकांपर्यत पोहचवणे, आभा कार्ड, ई- श्रम कार्डचे वितरण, प्लास्टिकमुक्त भारत या अभियानांतर्गत वृत्तपत्रापासून पिशव्या बनवणे, विदयार्थ्यांसाठी विविध स्पर्धाचे आयोजन, उद्योजगता विकास या कार्यक्रमांतर्गत फूड व गेम स्टॉल्स लावणे, स्वच्छता जनजागृती, सरकारी योजना व ग्रामीण विकास, जल संवर्धन, पर्यावरण संरक्षण या विषयांवर पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते.

१६ डिसेंबर रोजी सात दिवसीय निवासी शिबिराचा समारोप समारंभ पार पडला. या समारंभाला अंजुमन विज्ञान महाविद्यालयाचे चेअरमन स.जैनुद्दीन उ.कादिरी, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य इस्माईल शेख, तौसीफ ई.फत्ते, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चिपळूणमध्ये सापांबाबत जनजागृती

। चिपळूण । वार्ताहर ।
विषारीवबिनविषारीसापांबाबत पुरेसे ज्ञान नसल्याने तशी शहानिशा न करताच बऱ्याचदा सापांना मारले जाते. त्यामुळे सापांबाबत समाजामध्ये जनजागृतीची गरज असल्याचे मत सर्पमित्र प्रा. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी केले. डीबीजे कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मौजे अडरे येथे आयोजित ग्रामीण पुनर्रचना निवासी शिबिरात सर्प-मित्र मानवाचा या विषयावर ते बोलत होते.

शेतकऱ्यांच्या अन्नाच्या नासाडीला कारणीभूत असणाऱ्या उंदरांवर नियंत्रण मिळवण्यासाठी साप महत्वपूर्ण ठरतो. त्यामुळे सर्प हा मानवाचा मित्र आहे. साप हा आपल्या सगळ्यांच्याच कुतुहलाचा आणि भीतीचा विषय राहिला आहे. सापाबद्दल आजही समाजाम ध्ये त्यामध्ये शिक्षित, अशिक्षित सर्वच लोकांमध्ये अनेक गैरसमज पाहावयास मिळतात. हेच गैरसमज दूर व्हावेत आणि त्याबद्दलची परिपूर्ण माहिती मिळावी या हेतूने या कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानादरम्यान प्रा. म्हात्रे यांनी कोकणामध्ये आढळणाऱ्या विषारी व बिनविषारी सापांच्या प्रजातींची सचित्र माहिती दिली.

दुकानदारांची मराठी पाट्यांसाठी धावपळ

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।
महापालिका क्षेत्रातील दुकानांवरील पाट्या २५ नोव्हेंबरपर्यंत मराठीत असाव्यात, अशा सूचना सर्वोच्च न्यायालयाने दिल्या आहेत, पण या निर्णयाच्या अंमलबजावणीकडे दुकानदारांकडून दुर्लक्ष केले जात होते. त्यामुळे महापालिकेने नोटिसा बजावत कारवाई सुरू केल्याने खारघरमधील दुकानदारांची मराठी पाट्या लावण्यासाठी धावपळ सुरू आहे.

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना सुधारणा अधिनियम २०२२ मधील कलम ३६ क नुसार सर्व दुकाने, संस्था, वाणिज्य आस्थापना, निवासी हॉटेल्स, उपाहारगृहे किंवा सार्वजनिक मनोरंजनाची अथवा करमणुकीची इतर ठिकाणे आदी प्रकारच्या प्रत्येक आस्थापनेचा, दुकानाचा नामफलक देवनागरी लिपीतील मराठी भाषेमध्ये असणे बंधनकारक आहे. त्यानुसार पनवेल महापालिका हद्दीत नामफलक नसलेल्या दुकाने व आस्थापनांना नियमाप्रमाणे दुकाने किंवा आस्थापनांवरील नामफलक हा ठळक मराठी (देवनागरी) लिपीत असावा आणि इतर कोणत्याही भाषेपेक्षा लहान नसावा, असे नमूद करून दुकाने व आस्थापनांवर मराठी पाट्या लावण्यासाठी प्रभाग कार्यालयाकडून कारवाईच्या नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने मनसेच्या कार्यकर्त्यांनी मराठी भाषेला दुय्यम स्थान दिले जात असल्याने आंदोलन केले होते. या आंदोलनाची दखल घेऊन काही दुकानदारांनी मराठी पाट्या लावल्या होत्या; तर काहींनी त्याकडे दुर्लक्ष केले होते. त्यामुळे पनवेल महापालिकेने नोटिसा बजावत कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

आर्थिक नुकसानीची भीती

दुकानांसमोरील मराठी फलक लावण्यासाठी कमीत कमी एक ते चार हजार रुपये खर्च येतो. मात्र डिजिटल आणि विद्युत रोषणाई असलेल्या आकर्षक फलकांसाठी नऊ ते दहा हजार रुपये खर्च येत आहे. त्यामुळे कारवाईवेळी होणारे नुकसान टाळण्यासाठी बहुतांश दुकानदारांनी तातडीने दुकानांसमोरील फलक मराठीत लावले आहेत.

शारदा विद्यामंदिरास पंखे भेट

। पाली । वार्ताहर ।
सन २००१ या वर्षी दहावीच्या इयत्तेत शिकत असणाऱ्या माजी विद्यार्थी शारदा विद्यामंदिर पेडली हायस्कुलला सर्व वर्गात फळे व पंखे देण्यात आले. यामुळे या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. संस्थेचे संस्थापक तसेच अध्यक्ष जे. बी. गोळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. या हायस्कूलने बरेच इंजिनियर, डॉक्टर, शासकीय अधिकारी घडवण्यास योगदान दिले आहे. या कार्यक्रमास संस्थेचे सेक्रेटरी राजेश गोळे, मुख्याध्यापक श्री. नेमाडे, श्री. तळेकर, सामाजिक कार्यकर्ते बळीराम जाधव, प्रदीप गोळे, रमेश जाधव, सरिता चव्हाण, प्रशांत सागळे, राजेंद्र पवार, महेंद्र जाधव, नरेश गवारणे, राहुल कांबळे आदी मान्यवर तसेच शिक्षक वर्ग व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. तांडेल यांनी केले.

कोकण रेल्वेतर्फे नाताळसाठी जादा रेल्वे

। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।
कोकण रेल्वे मार्गावर नाताळ सणासाठी जादा रेल्वेगाडी धावणार आहे. मडगाव ते पनवेल आणि मडगाव, अशी २२ ते ३१ डिसेंबर या कालावधीसाठी जादा रेल्वे धावणार आहे.

गाडी क्र. ०१४२८ मडगाव जंक्शन येथून पनवेल विशेष रेल्वे सुटेल. ही गाडी मडगाव येथून सकाळी ८ वाजता सुटेल. ही गाडी रात्री ८ वाजता पनवेलला पोहोचेल. पनवेल येथून गाडी क्र ०१४२७ ही रात्री ९.१० ला सुटेल. मडगाव जंक्शनला दुसऱ्या दिवशी सकाळी ६.५० ला पोहोचेल. करमळी, थिवी, सावंतवाडी रोड, कुडाळ, कणकवली, वैभववाडी रोड, राजापूर रोड, रत्नागिरी, संगमेश्वर रोड, चिपळूण, खेड आणि रोहा स्थानकांवर थांबा आहे. गाडी क्र.०१४३० मडगाव जंक्शन रात्री ९ ला सुटून दुसऱ्या दिवशी ७.२० ला पनवेलला पोहोचेल. ही गाडी करमळी, थिवी, सावंतवाडी रोड, कुडाळ, कणकवली, वैभववाडी रोड, राजापूर रोड, रत्नागिरी, संगमेश्वर रोड, चिपळूण, खेड आणि रोहा स्थानकांवर थांबेल.

सुरक्षेच्या कारणास्तव भुयारी मार्ग होणार बंद

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।
नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सायन-पनवेल महामार्गावर रस्ता ओलांडण्यासाठी नेरूळ एलपी, उरण फाटा या ठिकाणी भुयारी मार्ग ठेवण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे या भुयारी मार्गांच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी असूनही येथे नेहमीच घाणीचे साम्राज्य असते. त्यामुळे पादचारी त्यांचा वापर करत नाहीत. तसेच, भुयारी मार्गात एखादा अनुचित प्रकार घडू नये, यासाठी सा. बां. विभागानेही हा भुयारी मार्ग शटर लावून बंद केला होता. परंतु काही गर्दुल्ल्यांनी त्यांचे शटर उचकटून त्याचा वापर सुरू केला आहे. त्यामुळे आता सुरक्षेच्या कारणास्तव हे भुयारी मार्ग पुन्हा बंद करणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

पनवेल- सायन महामार्गावर बांधकाम विभागाअंतर्गत सायन-पनवेल टोलवेज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला महामार्गाचे काम देण्यात आले होते. महामार्गाचे काम सुरू असताना पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्यात आले होते. भुयारी मार्गात पाण्याचा निचरा होण्यासाठी जागा नसल्यामुळे येथे पाणी साचले आहे. तसेच, कचऱ्याचे साम्राज्यही पसरले आहे. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव सार्वजनिक बांधकाम विभागाने हे भुयारी मार्ग शटर लावून बंद केले होते. मात्र काही समाजकंटकांनी हे शटर उचकटून या भुयारी मार्गाचा वापर करण्यास सुरुवात केली होती.

नवी मुंबईमध्ये प्लास्टिक बंदी कागदावरच

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।
नवी मुंबई महापालिका क्षेत्रात आता प्लास्टिकचा मुक्त वापर सुरू झाला आहे. यात सर्वाधिक वापर फेरीवाल्यांकडून होत असून स्वीट मार्टपासून किरकोळ विक्रेते प्लास्टिकमध्ये वस्तू देत आहेत. त्यामुळे कचऱ्यातून गायब झालेले प्लास्टिक पुन्हा दिसू लागल्याने नवी मुंबई प्लास्टिक बंदीचा फज्जा उडाल्याचे चित्र आहे.

राज्यात प्लास्टिक आणि थॅर्मकॉलच्या वस्तूंवर बंदी घातल्याची अधिसूचना मे २०१८ मध्ये राज्यसरकारकडून काढण्यात आली. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी महापालिकेला कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले गेले होते. त्यामुळे महापालिकेकडूनही प्लास्टिकचा वापर करणाऱ्यांवर काटेकोरपणे कारवाई करण्यात येत होती.

नियमित कारवाईनंतर अपयश

राज्य सरकारने प्लास्टिक बंदी लागू करून पाच वर्षांचा कालावधी झाला तरी नवी मुंबईत काही ठिकाणी चोरट्या, तर काही ठिकाणी खुलेआम प्लास्टिक वापर सुरू आहे. नियमित होणाऱ्या कारवाईवरूनच हे दिसून येते. प्लास्टिक बंदीची घोषणा झाल्यानंतर पालिका क्षेत्रात काही दिवस कडक अंमलबजावणी झाली होती.

आजही महापालिका विविध ठिकाणी प्लास्टिक वापरावर कारवाई करत आहे. मात्र, तरीही पिशव्यांचा वापर सर्रासपणे होत असल्याचे दिसत आहे. शहरातील मंडईमध्ये भाजी-विक्रेत्यांबरोबर फेरीवाल्यांकडूनही बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर केला जात आहे. त्यामुळे प्लास्टिक बंदीच्या निर्णयाच्या काटेकोर अंमलबजावणीत महापालिका अपयशी ठरली आहे. सरकारने ५० मायक्रॉनवरील प्लास्टिक पिशव्यांना काही अटींवर परवानगी दिली.

पण याचा चुकीचा अर्थ लावत व्यापारी, विक्रेत्यांनी बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्यांची विक्री-सुरू केली आहे.

बंद अवजड वाहनांमुळे अपघाताचा धोका

जिल्हा वाहतूक शाखेने दखल घेण्याची मागणी ; अवजड वाहनांची वाहतुकीची वेळ निश्चित करण्याची मागणी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग – पेण मार्गावरील कार्लेखिंड येथील चढणीवर अवजड वाहने सतत बंद होण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीबरोबरच अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.

अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण असून या ठिकाणी वेगवेगळी सरकारी कार्यालये, शाळा, महाविद्यालये आहेत. तसेच तालुक्याच्या काही ठिकाणी लहान मोठे उद्योगधंदे आहेत. त्यामुळे अलिबाग-पेण मार्गावर वाहनांची वर्दळ वाढली आहे. सरकारी वाहनांसह खासगी वाहनांची ये-जा वाढत आहे. अलिबाग तालुक्यातील उसर येथील कंपनीत गेल्या अनेक महिन्यांपासून नव्या प्रकल्पाचे काम सुरु आहे. या प्रकल्पासाठी लागणारे साहित्यांची वाहतूक अवजड वाहनांद्वारे केली जात आहे. सकाळी नोकरी व्यवसायानिमित्त अलिबागला येणाऱ्या लहान मोठ्या वाहनांना या अवजड वाहनांचा अडथळा कायमच ठरत आहे. कित्येक वेळा वाहतूक कोंडीला प्रवाशांना सामोरे जावे लागत आहे. तालुक्यातील कार्ले खिंड येथील वळणदार व चढणीवरील रस्त्यावर अवजड वाहने बंद होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. मागील आठ दिवसांपूर्वी एक कंटेनर बंद पडल्याने कित्येक तास वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे पर्यायी मार्गाने वाहतूक वळविण्यात आली होती. सुदैवाने मोठा अपघात टळला. पुन्हा या अवजड वाहने रस्त्यावर बंद होण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे अपघात होण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. त्याबाबत जिल्हा वाहतूक शाखेने योग्य ती दखल घ्यावी अशी मागणी होत आहे.

> अलिबागमध्ये सरकारी कार्यालयांबरोबरच शाळा, महाविद्यालये आहेत. त्याठिकाणी वेळेवर पोहचण्यासाठी विद्यार्थ्यांसह कर्मचाऱ्यांची लगबग असते. याच कालावधीत कार्लेखिंडीतून अवजड वाहनांची वाहतूकदेखील होते. ही वाहने रस्त्यातच बंद पडत असल्याने वाहतूक कोंडी निर्माण होते. त्यामुळे कार्यालय व शाळा महाविद्यालयात विद्यार्थ्यांना वेळेवर पोहचता येत नाही. त्यामुळे अवजड वाहनांच्या वाहतुकीची वेळ निश्चित करावी अशी मागणी आहे.
> पंडित पाटील - माजी आमदार)

> अलिबाग - पेण मार्गावरील अरुंद रस्त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होते. अवजड वाहने सतत बंद होण्याच्या घटनेनंतर त्यावर योग्य तो उपाय करण्यासाठी लवकरच वरिष्ठ पातळीवर मार्गदर्शनपर बैठक घेऊन तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल.
> -अनिल लाड
> पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा, रायगड

कलावंतीनीचा वाडा भग्नावस्थेत

। रेवदंडा । वार्ताहर ।

सराई नजीक प्राचीन कलावंतीनीचा वाडा भग्नावस्थेत चौलला ऐतिहासीक वारसा आहे. येथे अनेक प्राचीन मंदिरे तसेच वास्तू आजही पहावयास मिळतात. चौल परिसरातील सराई नजीक कलावंतीनीचा वाडा हा त्यापैकीच एक आहे. मुसलमानी पध्दतीचा आदिलशाही व निजामशाही राजवाटीच्या काळात करमणुकीसाठी कलावंतीनीचा वाडा बांधला असावा असे सांगितले जाते. पुरातत्व खात्याकडे असलेल्या कलावंतीचा वाडा पुर्णतः भग्नावस्थेत असल्याचे दिसून येते.

चौल ते वावे मुख्यः रस्त्यालगत चौल ग्रा. प. हद्दीतील सराई नजीक प्राचीन कलावंतीचा वाडा आहे. या वाडयाच्या समोरील व मागील बाजू ठीकठाक अवस्थेत आहे, मात्र आजूबाजूची तटबंदी पुर्णतः भग्न झालेली दिसते. त्याच्या दर्शनी बाजूस घडीव दगडाच्या तीन शिखर असलेल्या कमानी व तिन विटांनी बांधलेले घुमट होते. सभगृहात तीन घुमट व दोन्ही बाजूस दोन मोठया देवळया होत्या. त्याच्या पश्चिमेला ५० पावले रूंद व ७० पावले लांब अशी चहुबाजूनी भिंती बांधलेली जागा होती. या कलावंतीनीच्या वाडयाच्या पाठीमागे मोठे तळे आहे, प्राचीन काळी येथील कलाकारासाठी पाण्याची सोय असू शकेल. ऐतिहासीक नजरेतून त्या वास्तूत शांतपणे उभे राहिल्यास प्राचीन काळी धिरकणाऱ्या घुंगराचा आवाज आणि नाद कानावर पडल्याशिवाय रहात नाही.

ऐतिहासिक काळाचा साक्षीदार असलेला कलावंतीनीचा वाडा पुर्णतः भग्नावस्थेत असून या ऐतिहासिक ठेवाची जपणूक करणे गरजेचे आहे. सध्या कलावंतीनीचा वाडयाच्या आतील बाजूस शेतीक केली जात आहे. तर बाजूकडील तलावाचे पाणी स्थानिक ग्रामस्थांच्या पाण्याची गरज भागविते.

पथदिव्यांनी गावाचे रस्ते उजळले

■ जीवन साई सामाजिक संस्थेतर्फे भेट

। माथेरान । वार्ताहर ।

जीवन साई सामाजिक संस्था देव्हारे याच्या मार्फत अनेक गावात सौरऊर्जेचे पथदिवे लावण्यात आले. या दिव्यांमुळे संपूर्ण परिसर प्रकाशमय झाला असून रात्रीच्या वेळी या गावांमधील रस्ते उजळून निघाले आहेत. या परिसरातील अनेक गावांत रात्रीच्या वेळी काळोखाचे साम्राज्य पसरलेले असायचे येथून रात्री पायी चालत जाताना ग्राम स्थांना अनेक अडचणींना सामोरे जात जीव मुठीत घेऊन चालत जावे लागत होते. याठिकाणी पथदिवे पाहिजेत अशी मागणी येथील ग्राम स्थांच्या वतीने केली होती. यामुळे जीवन साई सामाजिक संस्थेतर्फे सौरऊर्जेवर चालणारे पथदिवे बसविले असे संस्थेचे सचिव विराज ताम्हाणे यांनी सांगितले.

संस्थेतर्फे गावागावात तसेच अनेक आदिवासी पाड्यांमध्ये वेळोवेळी अनेकदा विविध सेवाभावी उपक्रम राबविले जातात. संस्थेच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल पाचरळ गावातील कुलस्वामिनी सेवा समिती व समस्त ग्रामस्थांनी जीवन साई सामाजिक संस्थेचे सचिव विराज ताम्हाणे, खजिनदार सिद्धार्थ देशमुख आणि संस्थेचे सर्व पदाधिकारी याचे मनापासून आभार मानले. जीवन साई सामाजिक संस्थेने लावलेल्या पथदिव्यांमुळे येथे गावातील अनेक रस्ते प्रकाशमय झाले आहेत असे देखील ग्रामस्थांनी यावेळी सांगितले.

जासईत आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन

उरण : रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा.पाटील ज्यूनिअर कॉलेज दहागाव विभाग, जासई ता. उरण जि. रायगड. या विद्यालयात आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मार्गदर्शक म्हात्रे एम. के. यांनी विद्यार्थ्यांना महापूर, भूकंप, भुस्खलन, आग,आपघात, इत्यादी निसर्गनिर्मित व मानवनिर्मित आपत्तीच्या वेळी कोणती खबरदारी घ्यावी याचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रम ासाठी शैलेश घाग यांचीही विशेष उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नुरा शेख यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. अतुल पाटील यांनी केले.

वि. रा. देशमुख यांचा १०० वा वाढदिवस

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील पाली येथील ज्येष्ठ नागरिक वि. रा. देशमुख यांचा १०० वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तालुक्यातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात बाबा या नावाने ओळखले जाणारे देशमुख हे स्वातंत्र्य पूर्व काळात शिक्षक म्हणून सेवा बजावत होते.

यांचा शंभर वा वाढदिवस मोठ्या जल्लोषात त्यांच्या पाली या गावी करण्यात आला. त्याचा जन्म १२ डिसेंबर १९२३ साली पाली या गावी झाला. त्यांनी सातवी फायनलपर्यंत शिक्षण घेतले होते. यांनी सामाजिक, राजकीय वाटचालीत अनेक पदे भूषवली आहेत. १९४० मध्ये शिक्षकाची नोकरी करीत असताना १९४२ च्या लढ्यात कर्जत तालुक्यातून ब्रिटिश यंत्रणा विरुद्ध लढणाऱ्या क्रांतिकारकांना मदत करण्याचे काम यांनी केले आहे. १९४४ मध्ये तलाठी म्हणून काम केले, तर १९४७ मध्ये कशेळे शहाकरी सोसायटीम ध्ये अध्यक्ष म्हणून काम केले. रायगड जिल्हा परिषद सुरु झाली तेव्हा तीन वर्ष पंचायत समिती सदस्य जिल्हा खरेदी विक्री संघ तीन वर्षे उपाध्यक्ष म्हणून काम केले. रायगड जिल्हा बँक पाच वर्ष संचालक पद भूषवले आहे. यांनी आपल्या जीवनामध्ये अनेक पदे भूषवली आहेत.

तळा नगरपंचायतीत संकल्प यात्रा

। तळा । वार्ताहर ।

तळा शहरातील तळा नगरपंचायत येथे विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. केंद्र सरकार सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध योजना राबवित असून या योजना गोरगरीब नागरिकांपर्यंत तालुका स्तरावर पोहचविण्यासाठी शासनातर्फे विकसित भारत संकल्प यात्रा राबविण्यात येत आहे.केंद्र सरकारने पंतप्रधान स्वानिधी योजना, पंतप्रधान उज्वला योजना, आयुष्यमान कार्ड शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर, आधारकार्ड अद्यावत करणे यांसारख्या अनेक योजना गोरगरिबांच्या हिताकरिता आणल्या असून या योजना प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहचविणे गरजेचे असल्याने केंद्र सरकारच्या माध्यमातून विकसित भारत संकल्प यात्रेचा रथ संपूर्ण भारतभर फिरत आहे. त्याच अनुषंगाने या यात्रेचे तळा नगरपंचायत येथे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास नगराध्यक्षा माधुरी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, संकल्प यात्रेचे जिल्हा समन्वयक कैलास शिंदे, नायब तहसिलदार मंगेश पालांडे यांसह सर्वपक्षीय नगरसेवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **रबर (नायलॉन) स्टॅम्प्स,** वसंत क्लासेस, जैन मंदिरासमोर, बाजारपेठ, अलिबाग, (आधारकार्ड/कार्यालयाचे पत्र आवश्यक)
- **ऑफिस कामाकरीता मुलगी पाहिजे.** मो. ७४४७४८००००
- **अकाऊंटट पाहिजे : कमीत कमी ५ वर्षे अकाऊंटचा** अनुभव, पगार- २०,००० महिना ठिकाण- बामणसुरे, चोंढी, मो. ९८२३५८५३२१
- **फ्लॅट भाड्याने मिळेल,** RCF कॉलनीजवळ, ९४२३३७५१९८, ८४११०१६४४४
- **श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण,** नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- **वर्कशॉपमध्ये मशिन ऑपरेटर पाहिजेत** शिक्षण १० वी, १२ वी पास नापास ८ तास ड्युटी, पगार ९००० प्रति महिना संपर्क : ९०४९६५५५२३
- **नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** स्टाफची आवश्यकता आहे. १.ऑल राऊंडर कूक २.वेटर ३. किचनची भांडी घासण्यासाठी मोतीवाला २ ते ३ वर्षे अनुभवी असणाऱ्यांनी संपर्क साधावा-(व्हॉटसॲप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५/७८७५८६६५५५
- **अकाऊंटट पाहिजे कमीत कमी** ५ वर्ष अकाऊंटचा अनुभव, पगार २०,०००/- महिना ठिकाण-बामणसुरे, चोंढी मो.९८२३५८५३२१/९८२३५८५३२१
- **विद्यानगर येथे कॉटेजकरीता** पुरूष/महिला रिसेप्शनिस्ट आणि ऑल राऊंडर कुक पाहिजेत ९२७२३८३४७६/ ८३९०४२४२२२
- **रानवडे हॉस्पिटल अलिबाग येथे** हॉस्पिटलमध्ये कामासाठी पुरूष वार्ड असिस्टंटची आवश्यकता आहे. संपर्क-९७६४९९५७२८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

अंधश्रध्दा निर्मूलन समितीचा सन्मान

। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।

रायगड जिल्ह्यात विधवा प्रथा बंदीचा ठराव करण्याचा पहिला बहूमान मिळवणारी खुजारे ग्राम पंचायत, सरपंच, सर्व सदस्य आणि ग्रामस्थ यांचा महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन रायगड समितीच्या वतीने रविवार दि. १७ डिसेंबर रोजी खुजारे येथे सन्मान करण्यात आला. जिल्ह्यात हा धाडसी ठराव करण्याचा पहिला बहूमान मिळवून देण्याचा उल्लेखनीय आणि इतरांना प्रेरणा देणारे कार्य करणारे खुजारे ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक शंकर मयेकर, पती निधनानंतर शोकमग्न परिस्थितीतही विचलीत न होता आपल्या कुटुंबाला सावरत पतीची मरणोत्तर नेत्रदानाची इच्छा पूर्ण करुन समाजाला नवी दृष्टी देणाऱ्या श्रीवर्धन येथील अजिता दवटे, मुलगा उत्तराधिकारी सम जला जाणाऱ्या आपल्या प्रथेमध्ये पित्याच्या मृत्यूनंतर त्यांचे अंतिम संस्कार करुन आपले कर्तव्य कृतिशिलतेतून दाखवून स्त्री-पुरुष समानतेचा नवा आयाम सिध्द करणाऱ्या बोर्लीपंचतन येथील कै. सुरेश परकर यांच्या कन्या स्मिता पडवळ, सुचिता पवार, शीतल वेंगुर्लेकर, स्नेहा मयेकर, संपदा पाटील त्याचबरोबर गावस्तरीय सामाजिक समूहाच्या माध्यमातून महिलांनी पुढाकार घेत विधवा प्रथा बंदीच्या निर्णयाबरोबरच वैवाहिक समारंभात व मरणोत्तर करण्यात येणाऱ्या विधिमंधून समाज बांधव कुटुंबीयांना दिलासा देणाऱ्या व अन्नपदार्थांची, पैशांची नासाडी टाळणाऱ्या पर्यायांचा कालानुरूप पूर्वापार चालत आलेल्या जुन्या अनिष्ट रुढी परंपरांमधे सकारात्मक बदल करण्याचा निर्णय घेणारे बोर्लीपंचतन भंडारी समाज गणेश पेठ खोती, वेळास भंडारी समाज, श्रीवर्धन आणि दिवेआगर माळी समाज यांना पुरोगामी समाज हिताच्या तसेच महिला सन्मान वाढविणाऱ्या निर्णयाला मूर्त रूप देण्याबाबत उल्लेखनीय कार्याच्या योगदानाबद्दल महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती रायगडच्या वतीने विधवा प्रथा व अनिष्ट रुढी निर्मूलन समाज सन्मान २०२३ प्रदान करून गौरविण्यात आला.

याप्रसंगी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, कोकण विभाग राज्य सरचिटणीस विजय परब, आरती नाईक, प्रियांका खेडेकर, संदीप गायकवाड, सिध्देश गोसावी, प्रभाकर नाईक, मनोहर तांडेल, सुविधा गायकवाड, महेंद्र ओव्हाळ, तनुश्री खातू, महेंद्र नाईक, वरद ताटे, प्रा. कुंटेवाड, प्रा. लोखंडे, वैभव शिंदे, ज्योती परकर, मानसी जाधव, वसुधा खोत, बोर्लीपंचतन, वेळास भंडारी समाजाचे पदाधिकारी, श्रीवर्धन, दिवेआगर माळी समाजाचे पदाधिकारी, महिला प्रतिनिधी विविध समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पालकांची ई- रिक्षाची मागणी

। माथेरान । वार्ताहर ।

शालेय विद्यार्थ्यांची चार ते पाच किलोमीटरची नित्याची पायपीट थांबविण्यासाठी सेंट झेव्हीयर स्कुलच्या पालकवर्गाने लवकरच ई रिक्षा सुरू करावी याबाबत दि.१८ रोजी प्रशासक तथा मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या कार्यालयात समक्ष भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन सादर केले.

सुप्रीम कोर्टाने ई रिक्षा सुरू करावी असे आदेश दिलेले असताना देखील अद्याप ई रिक्षा ज्या मागील नऊ महिन्यांपासून धूळ खात पडून आहेत त्या सुरू केलेल्या नाहीत त्यामुळे लहान लहान कोवळ्या विद्यार्थ्यांना चार ते पाच किलोमीटर पायपीट करावी लागत असून त्यांच्या दप्तराचे ओझे घेऊन पालकांना आपले काम सोडून मुलांसोबत शाळेत जावे लागते. ई रिक्षामुळे शालेय विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम उत्तम प्रकारे होत असून वेळेत शाळेत जायला मिळते आणि विशेषतः महिला पालकवर्गाची दम छाक सुध्दा थांबेल असेही यावेळी पालकवर्गाने मुख्याधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी चंद्रकांत सुतार, आदेश घाग, राजू चौधरी, बंडू पवार आदी उपस्थित होते.

लग्न विधीत पारंपारिक गीतांना महत्व

। माणगाव । वार्ताहर ।

तुळशी विवाह नंतर सर्वत्र लग्न विधीचे सोहळे सुरू झाले आहेत. लग्नविधी हे अत्यंत उत्साहात सर्वत्र साजरे होत असताना पारंपारिक पद्धतीच्या, परंपरा, संस्कृती जपली जात आहे. लग्न विधीच्या निमित्ताने ग्रामीण तसेच शहरी भागात विविध प्रथा परंपरांचे पालन केले जाते. विविध प्रथा परंपरा पद्धतीनें लग्नविधी साजरे होत असताना आधुनिक काळात बरेचसे बदल झाले आहेत. लग्न विधित आधुनिकीकता दिसत असून लग्न सोहळे दिमाखदार होऊ लागले आहेत.

या लग्न सोहळ्यांमध्ये पूर्वीपासून गीते म्हणण्याची परंपरा आहे. या लग्न गीतातून नवरा, नवरीचे वर्णन, संस्कृती परंपरांचे वर्णन, कुलदेवता, ग्रामदेवता, इष्टदेवता यांचे वर्णन त्यांची आराधना उपासना केली जाते.

उठणे, हळद व लग्नविधी अशा तीन दिवसांच्या विधी सर्वसाधारणपणे सर्वत्र केल्या जातात. या तिन्ही दिवसांमध्ये उठण्याची गीते वेगळी, हळदीची गीते वेगळी व लग्न सोहळ्याची गीते वेगवेगळी असतात. या गीतातून मनोरंजन, तसेच पारंपारिकता जपली जाते.अत्यंत साध्या सोप्या स्वरूपाची, गेय असलेली ही गीते खास पारंपरिक साज असलेली असतात. या गीतातून समाजप्रबोधनाचेही काम केले जाते. वर-पक्ष वधुपक्ष यांचे वर्णन घराण्याचे वर्णन, कुळाचार तसेच भावी आयुष्यामध्ये नवविवाहात जोडप्यांनी कशा पद्धतीने आचरण केले पाहिजे याचे वर्णन तसेच कधीकधी गंमतीदार, विनोदी शब्दरचना या गीतातून केली जाते. या लग्न गीतांना पारंपारिकतेचा आधार असून स्थानिक बोली भाषेचा आधार, लोककथा, महाभारत, रामायण

यासारख्या ग्रंथांचा आधार घेत गीत रचना केलेली असते.गोड आवाजात गीते म्हणणारी एक किंवा दोन गायक महिला आसतात. त्यांना साथ सोबत करणाऱ्या इतरही मुली, महिला असतात. या गीत गाणाऱ्या महिलांचा आदर सत्कार व मान असतो.अलीकडे आर्थिक स्वरूपात बिदागी देण्याची पद्धती सुरू झाली आहे. प्रत्येक बोलीभाषेत हि लग्न गीते, धवले बोलली जात असून आधुनिक चित्रपटातील गाणी, त्यांतील शब्दरचना, ताल यांचाही आधार घेतला जातो. वधूची पाठवणी करताना तसेच हळदीचा विधी करताना म्हटली जाणारी गीते वातावरण निर्मिती करत असतात. लग्न विधी कितीही आधुनिक झाली तरी पारंपारिक लग्न गीतांना पूर्वीप्रमाणेच महत्व असल्याचे जाणकार सांगतात. महानुभव पंथाची स्त्री साधिका महदंबेने बाराव्या शतकात धवले गीतांची रचना केली होती. महाभारत काळातील श्रीकृष्ण - रुक्मिणी स्वयंवरावर आधारित धवल्यांची रचना असून या गीतातून तत्कालीन परंपरेची माहिती मिळते. अलीकडील काळात विविध समाज माध्यमातून लग्न गीते प्रसारित होत असून विविध चित्रपटातून, मालिकातून, व्हिडिओद्वारे, कॅसेट द्वारे लग्न गीते प्रसिद्धीस आली आहेत.

> लग्न समारंभात पारंपारिक गीते म्हणणे परंपरेचा भाग आहे.यातून वातावरण निर्मिती होते.विधीचे स्वरूप कळते. कुळाचार, रीती रीवाज तसेच देवी देवतांचे आवाहन केले जाते. मंगलता आणण्यासाठी ही गीते महत्वाची आहेत.
> शांताबाई पोटले
> लग्न गीत गायिका.

> लग्न समारंभात आधुनिकता आली असली तरी पारंपारिक गीते म्हणण्याची प्रथा सर्वत्र आहे. आपल्या संस्कृतीतील महत्वाचे रीती रिवाज, संस्कार यांचे वर्णन यातून केले जाते. या गीत गाणाऱ्या महिलांना म ानसन्मान असून यातून परंपरा जतन होते.
> कविता मोंडे,
> लग्न गीत गायिका

वाल्मिकी नगरात महाभंडाऱ्याचे आयोजन

माथेरान: माथेरानमधील वाल्मिकी नगरात आंबे मातेच्या पूजेनिमित्त गुजराती युवा रुखी समाजाच्या वतीने महाभंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले. गुजराती युवा रुखी समाजाचे अध्यक्ष गौरंग राजेश वाघेला यांच्या पुढाकाराने यावर्षी या आंबे मातेच्या पूजेनिमित महाभंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. आंबे मातेच्या दर्शनासाठी आणि महाभंडाऱ्याचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती.

याप्रसंगी सुनील शिंदे, शिवाजी शिंदे, प्रमोद नायक, प्रकाश सुतार, नरेश परदेशी, चंद्रकांत सुतार, मुकुंद रांजाणे, हर्ष शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी गौरंग वाघेला, दीपक पुरबिया, अंबालाल वाघेला, रुपचंद वाघेला, कल्पेश वाघेला, राजेश वाघेला, मनोज वाघेला, भरत वाघेला, ललित वाघेला, काळू वाघेला, पापा पुरबिया, अशोक वाघेला, कांती पुरबिया, नरेश पुरबिया, नारायण परमार, किसन वाघेला यासंह अन्य महिला कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

उरणमध्ये विशाल जागरण

। उरण । वार्ताहर ।

श्री माँ वैष्णव देवी मित्र मंडळ उरण नवी मुंबईच्या माध्यमातून दरवर्षी जागरण की शाम माता के नाम या नावाने भव्य विशाल जागरणाचे आयोजन केले जाते. १९ वर्ष सतत हे जागरण चालू आहे. यंदाचे जागरणचे २० वे वर्ष असून सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत नगर परिषद मराठी शाळा, पेन्शनर्स पार्क, एनएमएमटी बस स्टॉप, उरण शहर येथे या जागरणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पूजा, अभिषेक, भजन महाप्रसाद आदी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाबुराम वर्मा, सत्येंद्र सिंह, प्रभूनाथ सिंह, भगवती शर्मा, सुंदर यादव, दिनेश सिंहजी, ललित सिंहजी, अनिल गुप्ता, ग्यानचंद्र वर्मा, मुंशी यादव, नरेंद्र शुक्ला, अमर श्रीवास्तव, सियाराम यादव, बेचन परदेशी, अजय म्हात्रे, सनी म्हात्रे, लालू सिंह, मून्ना पांडे, कुमार जाधव, विजयनाथ यादव, रंजन श्रीवास्तव, राजेश यादव आदी पदाधिकारी मेहनत घेतली.

एकविरा मंदिराचे लोकार्पण

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील आवरे येथील मर्दनगडावर सह्याद्री प्रतिष्ठान व मर्दनगड संवर्धन समितीच्या पुढाकाराने आई एकविरा मातेचे मंदिर बांधण्यात आले आहे. या मंदिरामध्ये एकविरा आईची प्राणप्रतिष्ठापना शनिवार १६ डिसेंबर रोजी तसेच लोकार्पण सोहळा रविवार १७ डिसेंबर रोजी उरणचे माजी आ. मनोह भोईर व पी. पी. खारपाटील कंपनीचे संचालक राजेंद्र खारपाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संतोष ठाकूर, राजू मुंबईकर, निरा पाटील, कुलदीप नाईक, भरत देशमुख, भास्कर मोकल, शैलेश भोईर, संजय गावंड, महेश गावंड, सुरेश गावंड, संदीप गावंड ग्रामस्थ तसेच अनेक शिवभक्त व एकविरा आईचे भक्त उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुरेश भोईर, दिलेश ठाकूर, शंकर पाटील, गुरुनाथ गावंड, हितेंद्र म्हात्रे, विनोद ठाकूर, दिपेश ठाकूर, धीरज ठाकूर, राजू गावंड, संतोष म्हात्रे, तुषार म्हात्रे, किशोर गावंड, प्रशांत भोईर, अभिषेक ठाकूर, अलंकार ठाकूर, निलेश ठाकूर, चेतन पाटील, सुहास गोवारी नारंगीकर, संकेत ठाकूर, सुयोग पाटील सभासदांनी मेहनत घेतली.

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

विषय – महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ अन्वये जमीन संपादन करणेबाबत.

१. राज्य शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरीता अधिसूचित क्षेत्राच्या उभारणीसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३ अन्वये सिडको महामंडळास नवनगर विकास प्राधिकरण म्हणून घोषित केले आहे. नवी मुंबई प्रकल्पाकरीता जमीन संपादनासाठी निश्चित केलेल्या २२.५ % विकसित भूखंड वाटप योजनेअंतर्गत, नवनगर विकास प्राधिकरणाच्या अधिकारीतेत सिडको महामंडळाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ अन्वये नवी मुंबई प्रकल्पाकरीता अधिसूचित जमिनींच्या संपादनाची नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

२. उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र-१, पनवेल यांनी भूमि संपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ११ (२) अन्वये मौजे- वहाळ, ता. पनवेल येथील सर्व्हे नं. ३९५, क्षेत्र १.७५ हे.आर. जमीन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व तद्नुषंगिक कामासाठी संपादनाचा निवाडा क्र. वहाळ- युनिट केस क्र. १२ हा दि.०४/०७/२०१७ रोजी घोषित केला आहे. सदर निवाड्यामध्ये जमीनधारक श्री. मधुकर बाबु आंग्रे यांचे नावे संपादित जमिनीपोटी देय मोबदला स्वरुपात २२.५ टक्के विकसित भूखंड वाटप योजनेअंतर्गत २७६० चौ.मी. क्षेत्राची पात्रता निश्चित केली आहे. त्यानुसार सिडको महामंडळाच्या स्तरावर संगणकीय सोडतीद्वारे पुष्पक नोड (उलवे), सेक्टर-२६, भूखंड क्र. २, क्षेत्र २७६० चौ.मी. इरादित करण्यात आला आहे. तथापि, सदर भूसंपादन निवाड्याबाबत मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. १२३५४/२०१७ मध्ये दि. ०२ मे, २०२३ रोजी न्यायनिर्णय पारित केला असून, सदर जमिनीचा संपादनाचा निवाडा व्यपगत झाल्याचे घोषित केले आहे. त्यामुळे श्री. मधुकर बाबू आंग्रे यांचे नावे इरादित केलेला पुष्पक नोड (उलवे), सेक्टर-२६, भूखंड क्र. २, क्षेत्र-२७६० चौ.मी. हा भूखंड रद्द करण्यात येत आहे. तसेच मौजे- वहाळ, ता. पनवेल येथील सर्व्हे नं. ३९५, क्षेत्र १.७५ हे.आर. जमीन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व तद्नुषंगिक कामासाठी नव्याने संपादित करण्यात येत आहे.

३. भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई देण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ हा दि. ०१.०१.२०१४ पासून लागू झाला आहे. सदर अधिनियमातील कलम १०८ च्या उप-कलम (१) व (२) अन्वये राज्य शासनाच्या कायद्यान्वये किंवा धोरणान्वये संपादीत करावयाच्या जमीनीचा देय मोबदला व पुनर्वसनाचे लाभ हे सदर अधिनियमांच्या तरतुदीपेक्षा एकंदरीत जास्त देय असतील, तर संबंधित जमीनधारकाची राज्य शासनाच्या कायदा अथवा धोरणानुसार मोबदला व लाभ स्विकारण्यास संमती असेल, तर असा जास्तीचा मोबदला आणि पुनर्वसनाचे लाभ देय असलेल्या कायद्याच्या अथवा धोरणानुसार स्वीकारता येईल, अशी तरतूद आहे.

४. भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई देण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये जमीनीच्या संपादनापोटी देय असलेल्या मोबदला व पुनर्वसनाच्या लाभापेक्षा जमीनधारकांना एकंदरीत जास्त लाभदायक तरतूदी देणारे धोरण राज्य शासनाने नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. सिआयडी/१८१२/प्र.क्र.२७४/नवि-१० दिनांक ०१.०३.२०१४ व शासन निर्णय क्र. सिआयडी/३३१७/१२९५/प्र.क्र.१८४/ नवि-१० दिनांक २८.०२.२०१८ अन्वये सिडको महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या नवी मुंबई विकास प्रकल्पाकरीता लागू केले आहे आणि सदर जमीनसंपादन प्रक्रिया महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) अन्वये राबविण्यास मान्यता प्रदान केली आहे. सदर धोरणानुसार जमीन संपादनासाठी जमीनधारकाची संमती असल्यास त्यांना जमिन संपादनाच्या एकूण देय मोबदल्यापोटी २२.५% विकसित भूखंड वाटप योजनेअंतर्गत भूखंड वाटपाचे धोरण स्विकारले आहे.

५. राज्य शासनाने नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. सिआयडी/१८१२/प्र.क्र.२७४/नवि-१० दिनांक ०१.०३.२०१४ व शासन निर्णय क्र. सिआयडी/३३१७/१२९५/प्र.क्र.१८४/ नवि-१० दिनांक २८.०२.२०१८ अन्वये जमीन संपादनासाठी निश्चित केलेली नुकसान भरपाई व इतर लाभ जमीनधारकांना एकंदरीत फायदेशिर होत असतील व संबंधित भूधारकांनी सदर लाभ स्विकारल्यास अशा जमीनधारकांना भूमि संपादन अधिनियमा अन्वये वाढीव मोबदल्याबाबत कोणत्याही न्यायालयात अर्ज करण्याची मुभा राहणार नाही.

६. राज्य शासनाने नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. सिआयडी/१८१२/प्र.क्र.२७४/नवि-१० दिनांक ०१.०३.२०१४ व शासन निर्णय क्र. सिआयडी/३३१७/१२९५/प्र.क्र.१८४/ नवि-१० दिनांक २८.०२.२०१८ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) नुसार जमीन संपादन प्रक्रीया राबवून जाहीर करण्यात येणाऱ्या अंतिम संमती निवाड्याप्रमाणे अंतिमत: सर्व घटकांसह जमीनधारकांना देय होणाऱ्या २.५ चटई निर्देशांकासहीत १०% विकसीत जमीन व १२.५% भूखंड वाटप योजनेनुसार पात्र असणाऱ्या जमीनधारकांना १.५ चटई निर्देशांकासहीत विकसीत जमीन अनुज्ञेय राहील. त्यानुसार बाधीत जमीनधारकांस भूमि संपादनाच्या मोबदल्यात अनुज्ञेय व देय विकसीत जमिनीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशील	विकसित जमिनीची टक्केवारी
१	नुकसानभरपाईच्या रोख रकमेऐवजी विकसित जमीन	१०%
२	१२.५% भूखंड वाटप योजनेनुसार पात्र जमीनधारकांस विकसित जमीन	१२.५%
	एकूण मिळणारी विकसित जमीन २२.५%	२२.५%

७. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) मधील तरतुदीनुसार व या अधिनियमाच्या कलम १५२ व ११६ नुसार मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन), सिडको यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सूचित करण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या गावातील सर्व्हे नंबरनिहाय जमीनीबाबत मालक/कुळ व इतर हितसंबंधित व्यक्ती यांनी जमीन संपादनापोटी व उपरोक्त शासन निर्णयानुसार देय असणारा २२.५% विकसीत भूखंड मिळण्यास संमती असल्यास संमतीपत्रे किंवा हरकत असल्यास, ती लेखी स्वरूपात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून/मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन) यांचे कार्यालय, १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर - ४००६१४ येथे सादर कराव्यात.

८. परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेले गावनिहाय सर्व्हे क्रमांकापैकी जे सर्व्हे क्रमांक पडताळणीच्या प्रक्रियेमध्ये CRZ व कांदळवन बाधित असल्याचे निदर्शनास येतील आणि ज्या सर्व्हे क्रमांकाच्या ७/१२ सदरी इतर अधिकार रकान्यात प्रचलित कायदयानुसार हस्तांतरणास बंदी अशी नोंद असेल, अशा सर्व्हे क्रमांकाच्या जमिनीच्या संपादनाबाबत प्रकरणनिहाय गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल.

९. परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व्हे क्रमांकाची जमीन यापूर्वी नवी मुंबई प्रकल्पाकरीता अथवा अन्य प्रकल्पाकरीता सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित झाल्याचे दिसून आल्यास अथवा अन्य प्रकल्पाच्या प्रस्तावित संपादनामध्ये समाविष्ट असल्याचे दिसून आल्यास सदर जमिनीच्या संपादनाबाबत गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल.

परिशिष्ट

संपादनाचे प्रयोजन- नवी मुंबई प्रकल्पांतर्गत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व तद्नुषंगिक कामाकरिता

मौजे-वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड			
अ.क्र.	स.नं.	हि.नं.	संपादनासाठी प्रस्तावित असलेले क्षेत्र (हे. आर)
१	३९५	०	१-७५-०

(डॉ. जगन्नाथ म. विरकर)
अपर जिल्हाधिकारी तथा
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४७९/२०२३-२४

पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे महागांव ता.सुधागड, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमिन मिळकत आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन

मौजे महागांव ता.सुधागड, जि.रायगड येथील जमिन मिळकत

जमिन धारकाचे नाव	स.नं	प्लॉट नं	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
गोविंदजी रमेशचंद्र बन्सल	३९२ अ	एच-१सेनेरिटी फार्म्स फेज-३	१.८६.०० यापैकी २२८१.०० चौ.मी.	
राहुल मगनलाल टिंबाडीया	३९२ ब	एच-२सेनेरिटी फार्म्स फेज-३	१.८६.०० यापैकी २२०८.०० चौ.मी.	०.५०

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकतीची निर्वेध बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : १९/१२/२०२३

ॲड.साहिल राजेंद्र निगुडकर
पत्ता: कोर्ट व्ह्यू को.ऑप.हौ.सोसायटी, शॉप नं १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत, रायगड
मो नं. ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६.

ॲड.राजेंद्र पंढरीनाथ निगुडकर
पत्ता-ओम श्री भाग्योदय को.ऑप. हौ.सो. कोतवाल नगर कर्जत, रायगड
मो.नं. ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. संदीप बबन घाडगे, रा.मु. बेलवली, पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी तशी बोलणी केलेली आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पैसे)
बेलवली	५२	-	०-११-०० ०-०३-०० ०-१४-००	०.२५

या मिळकतीत जाणेयेणेसाठी असलेल्या १४ फूट रस्त्यासह सदर मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व बोजारहित असून या मिळकतीवरील आपली मालकी अबाधित आहे. तसेच सदरची मिळकत ही आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा श्री. संदीप बबन घाडगे यांचे सोबत माझे अशिल करत असलेल्या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहून आलेली अशी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळविले.

अलिबाग
दिनांक : १६/१२/२०२३

स्वाक्षरीत/-
CJAYANT LAW OFFICE
ॲड. रूजुता राजेंद्र घरत
बालाजी मंदिरा शेजारी, बालाजी नाका, अलिबाग, रायगड

श्री.इंदलकर सो. कोर्ट — **जाहीर नोटीस** — ॲड. प्रशांत कडव

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दिवाणी चौकशी अर्ज नं. १७६०/२०२३ नि.७/ड ने.ता.२०/०१/२०२४

१) श्रीमती. शेवंतीबाई तुकाराम म्हात्रे
वय ६६ वर्षे, धंदा- गृहिणी
२) श्री. सिताराम तुकाराम म्हात्रे
वय ४५ वर्षे, धंदा - रिक्षा चालक
३) श्री. सत्यवान तुकाराम म्हात्रे
वय ४० वर्षे, धंदा - व्यवसाय
४) सौ. नंदा मारुती भोईर
वय ४७ वर्षे, धंदा - गृहिणी
सर्व राहणार. मु. वळवली, पो. पडघे,ता. पनवेल, जि. रायगड
...अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही .....सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, **कै. तुकाराम भाग्या म्हात्रे** हे दिनांक ०९/०७/२०२० रोजी मौजे वळवली, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाल्या आहेत. **कै. तुकाराम भाग्या म्हात्रे** यांच्या मालकीची व ताबे कब्जे वहिवाटीतील मिळकत खालील वर्णन केल्या प्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

युनिट केस नं.	मौजे	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ
१२२	वळवली	९८	३	०.४७.३
१२२	वळवली	८४	३	०.१४.९
९१	वळवली	६	५	०.२१.०
९१ जे	वळवली	५	३	०.१९.०
१७१	आंबेतरखार	१६+१७ to ७९+१३० to १४१+१४७/४३८	२८८	०.८१.४

सबब वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वत: अथवा या मे. कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होऊन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही. तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करुन पुरावा घेऊन मे. कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

पनवेल, दिनांक : १६/१२/२०२३

कोर्टाचा शिक्का

क. लिपीक
दिवाणी न्यायालय क. स्तर, पनवेल

सहा.अधीक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, पनवेल

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जिल्हा- रायगड, पनवेल- ४१०२०६
जाहीर प्रकटन

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व रहिवासी मिळकत धारकांना या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, प्रभाग समिती ब-०३, व प्रभाग समिती ड-१७ असे एकूण २० अतिधोकादायक इमारतीतील रहिवाश्यांनी जीवित व वित्तीयहानी टाळण्यासाठी ज्या मिळकत, इमारती धोकादायक झाल्या आहेत अथवा त्यांचा काही भाग धोकादायक झाला आहे, अशा इमारतीमध्ये किंवा मिळकतीमध्ये कोणतेही वास्तव करू नये.

ज्याअर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ मध्ये नमुद केल्यानुसार ज्या इमारतींना ३० वर्ष पूर्ण झाली आहेत व ज्याअर्थी इमारतीचा प्रत्येक भाग आणि अंतर्गत प्रत्येक वस्तू तिच्यापासून धोका निर्माण होणार नाही अशा रितीने दुरूस्त करून सुस्थितीत ठेवणे हे प्रत्येक इमारतीच्या मालकाचे/भोगवटादाराचे आवश्यक कर्तव्य आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६५ अन्वये इमारतीचे मालक, भोगवटादाराची सदर इमारतीचे नोंदणीकृत बांधकाम अभियंता (Structural Engineer) यांच्याकडून तपासणी (Structural Audit) करून आवश्यकता असल्यास त्यांच्या देखरेखीखाली इमारतीची दुरूस्ती करून बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पनवेल महानगरपालिका हद्दीतील मिळकतधारकांनी स्ट्रक्चर ऑडिट रिपोर्ट सादर केला आहे. परंतु, ३३ मिळकतधारकांनी आजपावेतो सदरची धोकादायक इमारती/बांधकामे रिकामी केलेली नसल्याने, पावसाळ्यामध्ये धोकादायक इमारती पडून हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (Website) प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

त्याअर्थी संबंधितांनी अशा धोकादायक इमारती/बांधकामे तात्काळ रिकामी करून अशी बांधकामे तात्काळ पाडून/उतरवून घ्यावीत. अन्यथा अशा धोकादायक इमारती कोणत्याही प्रकारची जीवित वा वित्तीयहानी झाल्यास त्यास संबंधित घरमालक/भोगवटादार हे जबाबदार राहतील या बाबतीत महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(सोबत प्रभाग निहाय यादी).

सही/-
पमपा/अ.बां.नि./२४२३/जा.क्र. १०६/२०२३
दिनांक : १५/१२/२०२३

(गणेश देशमुख)
आयुक्त
पनवेल महानगरपालिका

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे आंबिवली तर्फे कोतलखलाटी आणि मौजे धामणी, ता.कर्जत जि.रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकती भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमांच्या खुद्द मालकीच्या मिळकती असून, आम्ही सदर मिळकतींच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

जमिन मिळकतींचे वर्णन

मौजे आंबिवली तर्फे कोतलखलाटी, ता.कर्जत जि.रायगड येथील

अ. क्र.	भोगवटाधारकाचे नाव	स.नं	उपविभाग	क्षेत्र हे.-आर.-चौ.मी.	आकार रू.पै.
१.	उमा सुनिल दम्मानी आनंद सुनिल दम्मानी	२	१/अ	०-१५.१०	०.३७
२	रेखा विजय झंवर	२	१/ब/२	१-४०.१०	४.९९
३	विजय रामकिसन झंवर	७०	१/ब	२-२८.०० पैकी १-२२.००	१.६२ पैकी ०.७९

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतींसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहीत मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून मालकी हक्काचे प्रमाणपत्र (Title Certificate) देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.१९/१२/२०२३

श्री.तुषार द.देवरे, ॲडव्होकेट
पत्ता: फ्लॅट नं.ए-२, जय नगर को.ऑप.हौ.सोसा.लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६, जि.रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८
tushar.deore82@gmail.com

Change in name

I vandana Bharatkumar patel Resident at jeet Nagar, Thal, Tal-Alibag, Dist-Raigad 402207, Declate and Affirm as under, my old Name was vandnaben Bharatkumar patel. I have change my name to vandana Bharatkumar patel for all future purposes Affidavit No.m-23247443

Sign
Vandana Bharatkumar patel
(New name)

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-पोसरी ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत मी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्याकडून विकत घेण्याची ठरविले आहे.

मालकाचे नाव	सर्व्हे नं	हि.नं.	क्षेत्र हे.आर.चौ.मी	आकार रू.पै.
शंकर पांडूरंग थोरवे व इतर	४७	६	०-१५-२०	२=१०

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षीस, वारसहक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून मी सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करेन मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती माझ्यावर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : १९/१२/२०२३

खरेदीदार
प्रकाश धोंडू बेंडे
बेंडेमळा मंचर, जुना पुणे नाशिक रोड, मंजुबा मंदिरजवळ चांदोली बुद्रुक, पुणे- ४१०५०३
मो.९५६१९०९०९७

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड, येथील सिटी सर्व्हे नं.६४१ व सिटी सर्व्हे नं.६४०/४ बी, या बिनशेती मिळकतींवरील ''अमृत सागर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत'' या इमारतीमधील, तळ मजल्यावरील, व्यापारी गाळा नं.४, क्षेत्र ३५ चौ.मी. बिल्टअप, अलिबाग नगरपरिषद मिळकत नं. Z1MKT001401, जुना मालमत्ता क्र.११३०, ही व्यापारी गाळा मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.निलेश सिताराम भगत, रा.मु.वाडगांव, पो.वेश्वी, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्

क्षणिक

साई सुदर्शन चौथा सलामीवीर

नवी दिल्ली : पदापर्णातच अर्धशतक करण्याची कामगिरी करणारा साई सुदर्शन हा भारताचा चौथा खेळाडू ठरला आहे. त्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात नाबाद ५५ धावांची खेळी केली. याआधी रॉबिन उथप्पाने २००६ मध्ये इंग्लंडविरुद्ध नाबाद ८६ धावा, के.एल. राहुलने २०१६ मध्ये झिम्बाब्वेविरुद्ध नाबाद १०० धावा, विदर्भाकडून रणजी ट्रॉफी खेळणाऱ्या फैज फजलने २०१६ मध्ये झिम्बाब्वेविरुद्ध नाबाद ५५ धावा केल्या आहेत.

कर्णधाराला हृदयविकाराचा झटका

लंडन : ल्यूटन संघाचा कर्णधार टॉम लॉकयरला यावर्षी दुसऱ्यांदा हृदयविकाराचा झटका आल्याने तो मैदानात कोसळला. यामुळे प्रीमियर लीग फुटबॉलचा सामना हा रद्द करावा लागला. लॉकयरला लगेचच रुग्णालयात दाखल करण्यात आले, आता त्याची स्थिती स्थिर आहे. त्याचे कुटुंब त्याच्यासोबत आहे, असे त्याच्या संघाकडून सांगण्यात आले. वेल्सचा हा बचावपटू सामन्याच्या ५९व्या मिनिटाला मैदानावर कोसळला.

बांगलादेश विश्वविजेता

नवी दिल्ली : दुबई येथे झालेल्या १९ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात बांगलादेशने यूएई संघाचा पराभव करीत पहिल्यांदाच आशिया चषकावर नाव कोरले. प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने ५० षटकांत ८ गडी गमावून २८२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशच्या गोलंदाजांच्या आक्रमणाने यूएईच्या संघाला एकामागोमाग एक धक्के दिले. त्यामुळे यूएईचा संघ अवघ्या ८७ धावांवर सर्वबाद झाला.

किशनची कसोटीतून माघार

नवी दिल्ली : दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी भारतीय संघामध्ये मोठा बदल करण्यात आला आहे. इशान किशनच्या जागी केएस भरतचा कसोटी संघात समावेश करण्यात आला आहे. ईशान किशनने या कसोटी मालिकेतून विश्रांती मागितली होती. त्यामुळे बीसीसीआयला हा बदल करावा लागला. यष्टीरक्षक फलंदाज इशान किशनने वैयक्तिक कारणांमुळे संघातून विश्रांती मागितली होती. त्यावर हा निर्णय घेण्यात आल्याचे बीसीसीआयने म्हटले आहे.

रोहित होणार चेन्नईकर?

नवी दिल्ली : मुंबई इंडियन्सच्या कर्णधारपदावरुन तडकाफडकी हटविल्याने रोहित शर्माचे चाहते नाराज झाले आहेत. त्यामुळे रोहिने चेन्नई सुपर किंग्स या संघात जावे, असे बऱ्याच चाहत्यांचे म्हणणे आहे. कारण, चेन्नई हा मुंबईच्या तोडीस तोड संघ आहे. दोन्ही संघांनी आतापर्यंत प्रत्येकी पाच जेतेपदं पटकावली आहेत. त्यामुळे चेन्नईच्या संघात रोहित गेला तर त्यांना अजून जेतेपदं मिळवता येऊ शकतात. त्यामुळे आता चेन्नई रोहितला आपल्या संघात घेणार का, याची उत्सुकता सर्वांना लागलेली असेल.

फिफा विश्वचषकाचे सौदीत आयोजन

फुटबॉलचा थरार भारतात?

स्पर्धेतील काही सामने आयोजनासाठी प्रयत्न

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

ऑलिंपिक या क्रीडा महोत्सवाच्या आयोजनासाठी पुढाकार घेण्यात आल्यानंतर जगातील पहिल्या क्रमांकाचा खेळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फुटबॉलच्या विश्वचषकातील काही लढतींच्या आयोजनासाठी अखिल भारतीय फुटबॉल संघटनेकडून (एआयएफएफ) प्रयत्न करण्यात येत आहेत. सौदी येथे २०३४ मध्ये फिफा विश्वकरंडक आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेतील काही लढती भारतात खेळवण्यासाठी कंबर कसली आहे, अशी माहिती एआयएफएफचे अध्यक्ष कल्याण चौबे यांनी दिली.

२०३४ मधील विश्वचषकाच्या आयोजनासाठी सौदी अरेबिया या एकमेव देशाचा प्रस्ताव फिफाकडे आला होता. आशियाई फुटबॉल कॉन्फेडरेशनकडूनही सौदी अरेबियाला हिरवा कंदील दाखवण्यात आला. एआयएफएफकडून सौदी अरेबियाला आयोजनासाठी पाठिंबा देण्यात आला. अखेर फिफाकडून सौदी अरेबियाला विश्वकरंडकाच्या आयोजनाचा मान देण्यात आला.

४८ संघ व १०४ सामने

२०३४ मध्ये सौदी अरेबिया येथे विश्वचषक होणार आहे. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेमध्ये जगभरातून ४८ देशांचा सहभाग असणार आहे. तसेच संघ वाढल्यामुळे या स्पर्धेमधील लढतीही वाढणार आहेत. तब्बल १०४ सामन्यांनंतर या स्पर्धेचा जेता ठरणार आहे.

भारतासाठी ऐतिहासिक घटना

सहयजमानपदाचा प्रस्ताव ठेवण्यात आला तर मग फिफा विश्वचषकात भारतीय संघही सहभागी होईल. कारण, यजमान संघाला पात्रता फेरीविना स्पर्धेत प्रवेश दिला जातो. भारतीय फुटबॉल क्षेत्रासाठी ही ऐतिहासिक व संस्मरणीय घटना असणार आहे.

कार्यकारिणी बैठकीत चर्चा

एआयएफएफची कार्यकारिणीची बैठक ९ नोव्हेंबरला पार पडली. या बैठकीत कल्याण चौबे यांनी विश्वचषकातील काही सामने भारतात आयोजित करण्यासाठी योजना आखायला हवी, याबाबत आपले मत व्यक्त केले. १०४ लढतींपैकी किमान दहा लढती भारतात खेळवण्यात याव्यात यासाठी प्रयत्न व्हायला हवा, असे त्यांचे म्हणणे होते.

गावंड विद्यालयात क्रीडा स्पर्धा उत्साहात

। पाली । वार्ताहर ।

कोकण एज्युकेशन सोसायटीचे डॉ. प्रभाकर रामचंद्र गावंड विद्यालय परळीत दि.१३ डिसेंबर रोजी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन शिवसेना (उबाठा) शाखाप्रमुख परळी उदय धुमाळ तसेच सामाजिक कार्यकर्ते सुनील वाघोस्कर यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

शालेय क्रीडा स्पर्धेला सुरुवात करण्याअगोदर उपस्थित पाहुण्यांचा शिक्षक भालेराव यांनी परिचय करून दिला. उपस्थित पाहुण्यांचे शिक्षक अहिरे आणि शिक्षिका सौ. शिरसाळे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच शाळेचे चेअरमन ॲड. प्रवीण कुंभार यांचे श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

यावेळी पाहुण्यांसमवेत विद्यार्थांनी शपथ घेऊन स्पर्धा उत्साही वातावरणात संपन्न झाल्या. यावेळी शाळेतील शिक्षक आनंद मनवर, शिक्षक सुरवसे, शिक्षिका सौ. बोरिटकर, सौ. हिंदोळे, शिक्षकेतर कर्मचारी सौ. घुटे, श्री. राम बोरिटकर व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला होता.

● विघ्नहर्ता खारीक पाडा टुर्नामेंटमध्ये राजन स्पोर्ट्स बेलोशी संघ प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला.

दुसरा सामना तीन तास उशिरा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारत आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना उद्या मंगळवार, दि. १९ डिसेंबर रोजी पोर्ट एलिझाबेथ येथील सेंट जॉर्ज पार्क स्टेडियमवर खेळला जाणार आहे. पहिला सामना भारतीय वेळेनुसार दुपारी १.३० वाजता सुरु झाला होता. पण, दुसरा सामना तीन तास उशिराने म्हणजेच, दुपारी ४.३० वाजता सुरू होईल. नाणेफेक ४ वाजता होईल. स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर चाहत्यांना या सामन्याचे थेट प्रक्षेपण पाहता येईल. दुसरीकडे, थेट प्रवाह डिस्ने प्लस हॉटस्टारवर असेल.

पीएनपीचे तायक्वांदोमध्ये यश

ओम टेंगळेची राज्यस्तरीय निवड चाचणीकरिता निवड

। अलिबाग । वार्ताहर ।

बोईसर पालघर येथे दि. १७ डिसेंबर रोजी मुंबई विभागस्तरीय तायक्वांदो क्रीडा निवड चाचणी क्रीडा स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत पीएनपी कनिष्ठ महाविद्यालयाचा इयत्ता ११ वी कला शाखेत शिकणारा ओम प्रमोद टेंगळे याने उत्कृष्ट खेळ दाखवत सुवर्णपदक प्राप्त केले. या कामगिरीच्या जोरावर त्याची गुरुवार, दि. २१ डिसेंबर रोजी लातूर येथे होणाऱ्या ५९ किलो वजनी गटाच्या निवड चाचणी क्रीडा स्पर्धे करिता निवड झाली आहे.

ओम प्रमोद टेंगळे तसेच क्रीडा शिक्षक तेजेश म्हात्रे यांचे संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रवींद्र पाटील, उपप्राचार्य निशिकांत कोळसे, आशिष पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

शिरवली संघ अंतिम विजेता

। खांब । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील देवकान्हे येथे यंगस्टार देवकान्हे यांच्यावतीने व खांब विभाग क्रिकेट असो. यांच्या सहयोगाने संपन्न झालेल्या विभागीय क्रिकेट स्पर्धेत शिरवली संघाने अटीतटीच्या अंतिम सामन्यात सर्वोत्तम कामगिरी करून विजेतेपदावर आपले नाव कोरले.

उपसरपंच सूरज कचरे, ग्रा.पं.सदस्य दयाराम भोईर, माजी सदस्य दत्ता भोईर, पो. पाटील दयाराम भोईर, देविदास भोईर यांच्या हस्ते या क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. या स्पर्धेतील उपविजेतेपद मुठवली संघाने पटकावले. तर तृतीय क्र. खांब या संघाने पटकावला. मालिकावीर म्हणून शुभम भोईर, उत्कृष्ट गोलंदाज निलेश टवळे व उत्कृष्ट फलंदाज म्हणून स्वरूप कापसे यांना माजी उपसरपंच ज्ञानदेव भोईर, रोहा कुणबी युवक अध्यक्ष अनंत थिटे, देविदास भोईर व दत्ता भोईर आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या सामन्यांच्या यशस्वीतेसाठी यंगस्टार देवकान्हेच्या सर्व सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

महाराष्ट्र-कर्नाटकमध्ये जेतेपदाची लढत रंगणार

। कर्नाटक । वृत्तसंस्था ।

महाराष्ट्राचे दोन्ही संघ (किशोर-किशोरी) अंतिम फेरीत पोहोचले असून, राष्ट्रीय किशोर-किशोरी विभागाच्या खो-खो स्पर्धेत दुहेरी यशाची संधी याप्रसंगी असणार आहे. महाराष्ट्राच्या दोन्ही संघांना जेतेपदाच्या लढतीत कर्नाटकच्या संघांचा सामना करावयाचा आहे. कर्नाटक येथे ही स्पर्धा सुरू आहे.

टिपटूर येथे होत असलेल्या या स्पर्धेतील किशोर विभागाचा उपांत्य फेरीचा सामना महाराष्ट्र आणि तेलंगणा यांच्यात झाला. साखळी सामन्यात तेलंगणा संघाने महाराष्ट्राला झुंजवले होते. पण, उपांत्य फेरीच्या लढतीत महाराष्ट्राच्या आक्रमक खेळापुढे तेलंगणाच्या खेळाडूंचा निभाव लागला नाही. महाराष्ट्राने ही लढत एक डाव ६ गुणांनी (२२-१६) जिंकली. ओमकार सावंत (२.४० मि. संरक्षण व २ गुण), श्री दळवी (२.२० मि. संरक्षण), हारद्या वसावे (२.३० मि. संरक्षण व १२ गुण), आदेश पाटील (१.२० मि. नाबाद, १.३० मि. संरक्षण व ४ गुण) यांच्या दमदार खेळामुळे महाराष्ट्राचा विजय निश्चित झाला. तेलंगणतर्फे एम. निखिलकुमार (१ मि., १ मि. संरक्षण व ४ गुण), एस. शंकर (१ मि. संरक्षण व २ गुण) यांनी चांगला खेळ केला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात यजमान कर्नाटक संघाने दिल्लीचा चुरशीच्या लढतीत ४ गुणांनी (२८-२४) पराभव करत अंतिम फेरी गाठली. त्यात टी. राज (३.३०, १.५० मि. संरक्षण व ४ गुण) याने महत्वाची खेळी केली.

किशोरी विभागातील लढतीत महाराष्ट्राने राजस्थानवर ४ गुण आणि ०.५० सेकंद (२६-२२) राखून मात केली. महाराष्ट्राकडून मैथिली पवार (२.४० मि., १.५० मि. संरक्षण व ४ गुण), स्नेहा लोमकाणे (१ मि., १.२० मि. संरक्षण व १० गुण), कल्याणी लोमकाणे (१.३० मि., १ मि. संरक्षण व २ गुण) यांनी चांगला खेळ केला. राजस्थानतर्फे गरिमा (१.३०, १.१० मि. संरक्षण), पायर सैनी (१.१०, २.१० मि. संरक्षण), आशू (८ गुण) यांनी छान खेळ केला; मात्र संघाला विजय मिळवून देण्यात त्यांना अपयश आले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात यजमान कर्नाटकने कोल्हापूरचा ४ गुणांनी पराभव केला. विजयी संघातर्फे विद्यालक्ष्मी (२.१०, १.१० मि. संरक्षण), गौतमी (२.३०, १.३० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी महत्वाची खेळी केली. कोल्हापूरतर्फे अमृता नाईक (१, २.४० मि. संरक्षण व २ गुण) हिने अष्टपैलू खेळ करीत विजयासाठी झुंज दिली.

एसबीसी महाड संघ विजयी

आरुष कोल्हेची दमदार खेळी

। पोयनाड । क्रीडा प्रतिनिधी ।

झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित कै. मिलिंद रवींद्र चवरकर स्मृतिचषक एकदिवसीय ४० षटकांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेतील साखळी फेरीच्या सामन्यात एसबीसी क्रिकेट अकॅडमी महाड संघाने करण क्रिकेट अकॅडमी कामोठे संघावर विजय मिळवला आहे.

नाणेफेकीचा कौल जिंकून प्रथम फलंदाजीला आलेल्या एसबीसी क्रिकेट अकॅडमी महाड संघाने धुवाधार फलंदाजी केली. सलामीवीर अष्टपैलू खेळाडू आरुष कोल्हे याने चौफेर टोलेबाजी करत शतक ठोकले. त्याने १०८ चेंडूंचा सामना करत १७ चौकार आणि ९ षटकार ठोकत १६० धावा काढल्या. दुसऱ्या बाजूने रोशनी पारधी हिने आरुषला साथ देत ६१ धावांचे योगदान दिले. दोघांनी २१९ धावांची भागीदारी केली. अमर बी.के याने मधल्या फळीत ५० धावा काढल्या. ४० षटकांच्या समाप्तीनंतर महाड संघाने ३२१ धावांचे लक्ष्य ठेवले होते. कामोठे संघाकडून पियुष दांडेकरने २, कल्पित कोळीने एका फलंदाजाला बाद केले.

प्रत्युत्तरात करण क्रिकेट अकॅडमी संघाने २९ षटकांमध्ये सर्व गडी गमावत ११० धावाच केल्या. वेदांत शिंदेने १६ धावा काढल्या. महाड संघाकडून शिवा कुशवाहने ३, प्रचिती जाधव व अश्वत तेगवान यांनी प्रत्येकी २ फलंदाज बाद केले. शतकवीर अष्टपैलू खेळाडू आरुष कोल्हे याला सामनावीर, पियुष दांडेकर स्टार प्रतिस्पर्धी खेळाडू, इमार्जिंग प्लेअर प्रचिती जाधव, अमर बी.के., आयुष शिर्के, वेदांत शिंदे उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून आर्यन पांडे, अल्तामाश खान यांना झुंझारचे सचिव किशोर तावडे, अशोक जैन, योगेश तावडे, संदीप जोशी, करण कांबळे, आवेश चीचकर, संकेश ढोले, आदेश नाईक यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

इतिहासात पहिल्यांदाच सातासमुद्रापार आयपीएल लिलाव

आज दुबईत खेळाडूंवर पैशांचा पाऊस

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आयपीएल २०२४च्या मिनी लिलावासाठी क्रिकेट चाहत्यांची प्रतीक्षा आता संपणार असून, खेळाडूंवर पैशांचा पाऊस पडणार आहे. हा लिलाव उद्या (१९ डिसेंबर) दुबईत होणार आहे. आयपीएलच्या इतिहासात पहिल्यांदाच हा लिलाव परदेशात होणार आहे. या लिलावात ३३३ खेळाडूंवर बोली लावली जाणार आहे. यातून काही खेळाडू करोडोपती, तर काही लखोपती होणार आहेत.

आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलने या खेळाडूंची यादी आधीच जाहीर केली होती. यावेळी हा मिनी लिलाव भारतीय वेळेनुसार दुपारी एक वाजता सुरू होईल. लिलावासाठी निवडलेल्या ३३३ खेळाडूंपैकी २१४ भारतीय आहेत, तर ११९ परदेशी खेळाडू आहेत. तसेच या यादीत १११ कॅप्ड आणि २१५ अनकॅप्ड खेळाडू आहेत.

लिलावात महिलेचा आवाज दुमदुमणार

या लिलावात पहिल्यांदाच भारतीय महिलेचा आवाज दुमदुमणार आहे. मल्लिका सागर दुबई लिलावात बोली लावणार आहेत. मल्लिका सागर ही मुंबईची रहिवासी असून तिने यापूर्वीही हे काम केले आहे. मल्लिकाने महिला प्रीमियर लीग २०२३च्या पहिल्या सत्रात सर्व खेळाडूंचा यशस्वी लिलाव केला होता. महिला प्रीमियर लीगमधील लिलावाची तिची वेगळी शैलीही लोकांना आवडली. परिणामी, मल्लिकाने महिला आयपीएलच्या दुसऱ्या सत्राचा लिलावही केला.

गुजरातकडे सर्वाधिक पैसे शिल्लक

गुजरात टायटन्सच्या पर्समध्ये सर्वाधिक ३८.१५ कोटी रुपये शिल्लक आहेत. म्हणजेच, हा संघ लिलावात सर्वाधिक पैसा खर्च करू शकतो. तर, आता त्याला फक्त ८ खेळाडू खरेदी करायचे आहेत. दुसरीकडे, लखनौ सुपर जायंट्स (एलएसजी) च्या पर्समध्ये सर्वात कमी १३.१५ कोटी रुपये शिल्लक आहेत. केएल राहुलच्या नेतृत्वाखालील या संघाला आता आणखी ६ खेळाडू खरेदी करायचे आहेत.

खेळाडूंवर होणार करोडोंचा वर्षाव

या मिनी लिलावात केवळ भारतीय खेळाडूच नाही तर परदेशी सुपरस्टार्सवरही करोडो रुपयांचा वर्षाव होणार आहे. या लिलावासाठी एकूण ३३३ परदेशी खेळाडूंनी आपली नावे नोंदवली आहेत. यात ट्रॅव्हिस हेड, रचिन रवींद्र, मिचेल स्टार्क, पॅट कमिन्स, डॅरिल मिशेल, हॅरी ब्रूक, आदिल रशीद, डेव्हिड मलान आणि टॉम कुरन, ख्रिस जॉर्डन, बेन डकेट, फिलिप सॉल्ट, टॉम बँटन आणि सॅम यांसारखे अनेक परदेशी सुपरस्टार्स आहेत.

देशी-विदेशी ३३३ खेळाडू रांगेत

२३ खेळाडूंची मूळ किंमत दोन कोटी

या लिलावासाठी दोन सहयोगी देशांतील खेळाडूंचाही समावेश करण्यात आला आहे. सर्व १० संघांमध्ये एकूण ७७ खेळाडूंची आवश्यकता आहे. याचा अर्थ, ३३३ निवडलेल्या खेळाडूंपैकी केवळ ७७ खेळाडूंचा लिलाव होईल. ३३३ खेळाडूंच्या यादीत असलेल्या २३ खेळाडूंची मूळ किंमत दोन कोटी रुपये आहे. तर १३ खेळाडूंची मूळ किंमत १.५ कोटी रुपये ठेवण्यात आली आहे. याशिवाय १ कोटी, ५० लाख, ७५ लाख, ४० लाख, ३० लाख आणि २० लाख रुपयांची मूळ किंमत असलेल्या खेळाडूंचाही या यादीत समावेश आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)